# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि. मुंबई

भारतीय क्रीडा मंदिर, ४था मजला, वडाळा, पी. बी. नं. ७१२०, मुंबई - ४०० ०३१.

# ४१ वा वार्षिक अहवाल




## २०१९-२०

राज्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राचे पालकत्व स्विकारलेली राज्यस्तरीय संघीय संस्था

# भावपूर्ण श्रद्धांजली



## कै. बाळासाहेब उर्फ दामोदर कृष्णाजी माजगांवकर

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनचे विद्यमान ज्येष्ठ संचालक व माजी अध्यक्ष आदरणीय बाळासाहेब उर्फ दामोदर माजगांवकर यांचे शुक्रवार, दि.४ सप्टेंबर, २०२० रोजी निधन झाले.

फेडरेशनच्या कामकाजामध्ये माजगांवकरसाहेबांचा ४० वर्षांहून अधिक सक्रिय सहभाग होता. सन १९८७-८८ आणि सन १९९८-९९ या कालावधीत दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स् फेडरेशनच्या अध्यक्ष पदाची धुरा त्यांनी समर्थपणे सांभाळली होती. फेडरेशनच्या दैनंदिन कामकाजामध्ये त्यांचे मौलिक मार्गदर्शन आम्हांला सातत्याने लाभत होते. शिवाय रिझर्व्ह बँक, केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन यांचेशी निगडीत असलेल्या नागरी सहकारी बँकांच्या प्रलंबीत प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी ते सातत्याने प्रयत्न करत होते.

सहकारी बँकांच्या सक्षमीकरणाकरिता आणि या बँकांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी जिल्हास्तरावर सर्व नागरी सहकारी बँकांच्या संचालकांना संघटीत होता यावे, याकरिता त्यांनी सन १९८२ रोजी 'सातारा जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि.' ची स्थापना केली. तसेच सदर असोसिएशनवर संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आणि आजतागायत दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स् फेडरेशन तथा सातारा जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनवर संचालक म्हणून कर्तव्यदक्षपणे कामकाज सांभाळले. फेडरेशनमधील त्यांचे अस्तित्व आणि आधार आम्हांला नेहमीच स्फूर्तीदायक ठरला आहे.

सर्वांसाठी आधारवड असलेल्या माजगांवकरसाहेब यांच्या अशा आकस्मिक निधनामुळे सहकारी बँकिंग क्षेत्राचा आवाज हरपल्याची जाणीव तीव्रतेने होत आहे. त्यांच्या जाण्यामुळे सहकारी बँकिंग क्षेत्रातील एक अभ्यासू व्यक्तिमत्व तसेच प्रेरणास्थान असलेली व्यक्ती काळाच्या ओघात हरवल्याची खंत फेडरेशनला नेहमीच होत राहील.

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनच्या परिवारातर्फे दिवंगत बाळासाहेब उर्फ दामोदर माजगांवकर साहेबांना भावपूर्ण श्रद्धांजली !

ॐ सर्वेशां स्वस्तिर्भवतु।<br>
सर्वेशां शान्तिर्भवतु।<br>
सर्वेशां पुर्णंभवतु।<br>
सर्वेशां मङ्गलंभवतु।<br>
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।।

# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि.मुंबई

भारतीय क्रीडा मंदिर, ४था मजला, नायगांव-वडाळा रोड, मुंबई - ४०० ०३१.

दूरध्वनी क्र.: २४१३५७९७,२४१५११८५ • E-mail: admin@mucbf.com • web: www.mucbf.com


## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
## (फक्त सभासदांकरिता)

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँकां व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्ची **४१ वी** वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक **२४ मार्च, २०२१** रोजी **दुपारी ०२:००** वाजता 'भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव-वडाळा रोड, वडाळा, मुंबई ४०० ०३१' येथे खालील विषयांवर कामकाज करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. कृपया आपण सदर सभेस अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन ती क्षमापित करणे.

२. दिनांक २४ सप्टेंबर,२०१९ रोजी झालेल्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

३. मा.अध्यक्ष यांनी सादर केलेला सन २०१९-२० सालचा वार्षिक अहवाल, ३१ मार्च, २०२० अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, तसेच सन २०१९-२० सालचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवालासहीत स्वीकृत करणे.

४. मा. संचालक मंडळाने मंजुर केलेल्या दि. ३१ मार्च, २०२० अखेरच्या वाढावा विभागणीस अनुसमर्थन देणे.

५. मा. संचालक मंडळाने मंजूर केलेल्या २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास अनुसमर्थन देणे.

६. मा. संचालक मंडळाने दिलेल्या मंजूरीनुसार फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता अंतर्गत लेखापरिक्षक आणि शासन मान्यताप्राप्त लेखापरिक्षकांच्या नामतालिकेतील वैधानिक लेखापरिक्षकाच्या नेमणूकीस अनुसमर्थन देणे.

७. मा.वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या फेडरेशनच्या सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या ताळेबंदातील येणे सर्व्हीस टॅक्स रक्कम रु.१,४०,८२४/- निर्लेखीत करण्यास मान्यता देणे.

८. मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार

दिनांक :१८/०२/२०२१

ठिकाण : वडाळा, मुंबई-३१

**सायली भोईर**

मुख्य कार्यकारी व सचिव

टिप : १) किमान गणसंख्येअभावी सभा स्थगित झाल्यास, अशी स्थगित झालेली सभा अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) सभेपूर्वी (दुपारी १२:३० वाजता) भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे, त्याचा प्रतिनिधींनी अवश्य लाभ घ्यावा.

३) कोविड -१९ या महामारीचा प्रादुर्भाव लक्षात घेता शासन आदेशानुषंगाने सदर सभेत मास्क वापरणे, तसेच सुरक्षित अंतर पाळणेही बंधनकारक आहे.

# अध्यक्षीय भाषण

**फेडरेशनच्या सर्व नागरी सहकारी बँका व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्सचे सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनींनो**!

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स् फेडरेशनच्या २०१९-२० सालच्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या सर्व सभासद नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्च्या सन्माननीय प्रतिनिधींचे मा.संचालक मंडळाच्यावतीने मी हार्दिक स्वागत करतो.

मंडळी! फेडरेशन ही नेहमीच आपल्या ध्येय, उद्दिष्टांप्रति प्रामाणिकपणे कार्यरत आहे. मात्र त्याचा लेखाजोखा हा माझ्या भाषणांत न येऊ देता, तो आपण आपल्या पातळीवर मांडून त्याच्या विश्लेषणाद्वारे आम्हाला गुण द्यावेत, अशी माझी नेहमीच आपणांस विनंती असते.

मध्यंतरी मुंबई येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात पार पडलेल्या नागरी सहकारी बँकांच्या सभेत मी केलेल्या अनेक आवाहनांना आपण उत्स्फुर्तपणे प्रतिसादही दिलात. त्यामध्ये आपल्या आजुबाजुच्या नागरी सहकारी बँकांमधून घडणाऱ्या अनिष्ट गोष्टींना प्रतिबंध करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आपण मान्यही केलेत. परंतु प्रत्यक्षात मात्र वैयक्तिक हितसंबंध जपत आपण गप्पच राहिलो ही वस्तुस्थिती आहे.

सहकारात राजकीय जोडे बाहेर ठेवून येण्याचे तत्वज्ञान आपण मान्य करतो, परंतु कृती मात्र या तत्वज्ञानाच्या संपूर्ण विरोधी करतो. पक्षिय व वैचारिक समानतेच्या नावाखाली होणारी विचारांची मुस्कटदाबी थांबली पाहिजे. या विवाद्य अवस्थेतून 'सहकार' हा विचार बाहेर पडला पाहिजे. मात्र सहकाराच्या संवर्धनासाठी आपल्या मनातील विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य या गटबाजीमुळे अनेकदा सदस्यांना मिळत नाही.

नेमक्या याच विसंवादाचा फायदा आपल्या नियामकांकडून घेतला जातो. या अशुध्द व अवघड परिस्थितीतून बाहेर पडून सर्व प्रकारचा विपर्यास टाळून सहकाराचे संजिवक सामर्थ्य आदर्श सहकाराच्या उभारणीसाठी उपयोगी पडावे, अशी भावना त्यामुळेच दृढ होत जाते. यासाठी राज्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्व संस्थांची विचारविनिमयासाठी एक शिखर संस्था असावी. त्या संस्थेला अध्यक्षपदच नसावे. त्यावर प्रत्येक संस्थेने आपल्या एका सदस्याची नियुक्ती करावी. नागरी सहकारी बँकांच्या प्रत्येक धोरणावर त्यामध्ये चर्चा घडवून आणून त्यातील निर्णयानुसार सर्वांचा सुर एकच असावा. आपले स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवून केवळ सहकाराच्या संवर्धनासाठी चर्चा करण्यास काय हरकत आहे? आपण करतो तेच कार्य श्रेष्ठ, आपला विचार हाच योग्य, ही भावना त्याजली पाहिजे. राज्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रावर 'कोणत्या पक्षाचे/विचारांचे वर्चस्व' हा विचार करुन आपण या क्षेत्रात कार्यरत राहणार असू तर या क्षेत्राच्या ऱ्हासाला आपणच जबाबदार राहू. या क्षेत्रामध्ये केवळ सक्षम बँकांचे अस्तित्व ठेवणे, म्हणजे हे क्षेत्र सुदृढ बनविणे, या रिझर्व्ह बँकेच्या धोरणाविरुद्ध आपण सर्वांनी एकत्रितपणे लढा दिला पाहिजे.

सध्याच्या परिस्थितीत स्वराज्याकडून सुराज्याकडे जाण्यासाठी इतर अनेक मार्गांपैकी सहकाराचा मार्ग देखील तितकाच महत्वाचा आहे हे आपण पटवून दिले पाहिजे. त्यासाठी राजकारण आणि सहकार यांची शुद्धता सांभाळण्याचे आवाहन या निमित्ताने मी आपण सर्वांना करतो आणि सर्व प्रकारचा विपर्यास टाळून सहकाराचे संजीवक सामर्थ्य आदर्श नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राच्या उभारणीसाठी उपयोगी पडावे अशी नम्र विनंती आपणां सर्वांना करतो.

यानंतर फेडरेशनच्या सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील कामकाजाचा आढावा मी आपणासमोर सादर करत आहे. फेडरेशनचा सन २०१९-२० चा ४१ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले फेडरेशनचे दि. ३१ मार्च, २०२० अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल, सन २०२०-२१ च्या उत्पन्न-खर्चाचे अंदाज पत्रक तसेच नागरी सहकारी बँकांसंदर्भात नियामकांनी जारी केलेल्या ध्येय धोरणांची माहिती, संचालक मंडळातील सदस्यांच्यावतीने सादर करताना मला अतिशय आनंद व समाधान होत आहे.

आपण जाणतच आहात की, फेडरेशन ही राज्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राचे पालकत्व स्वीकारलेली राज्यस्तरीय संघीय संस्था आहे. आपणा सर्वांच्या सहकार्याने फेडरेशन सर्व प्रकारचे कार्यालयीन कामकाज उत्तमप्रकारे व समाधानकारकपणे करुन आपल्या लौकिकास साजेशी कामगिरी करत आलेली आहे.

त्याचप्रमाणे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणपूर्व समिती, स्थायी सल्लागार समिती, टॅफकब समिती इ.च्या माध्यमातून फेडरेशन सभासद नागरी सहकारी बँकांच्या विविध समस्यांचे निवारण करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असते. रिझर्व्ह बँकेचे आर्थिक निकष व त्या राबविण्याच्या बाबी, वैधानिक बंधने, धोरणात्मक समस्या या संदर्भात तसेच बँकांना दैनंदिन कामकाजामध्ये येणाऱ्या अडचणींबाबत पत्राद्वारे व नागरी बँक वार्तापत्राद्वारे सतत मार्गदर्शन देखील फेडरेशन करीत असते.

त्याचबरोबर केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, सहकार खाते यांच्याकडून जारी केल्या जाणाऱ्या विविध योजनांबाबत तथा कायद्यातील घडामोडी इ.बाबत अद्ययावत माहिती नागरी सहकारी बँकांना उपलब्ध/अवगत करुन देण्याचे कार्य फेडरेशन करीत असते.



**फेडरेशनच्या चालू आर्थिक वर्षातील महत्त्वाच्या घडामोडी**

अहवाल सालातील महत्त्वाच्या या घडामोडींमध्ये फेडरेशनतर्फे खालीलप्रमाणे सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार वितरण सोहळा/कार्यशाळा/प्रशिक्षण वर्ग/परिषद/विनंती आंदोलन आयोजित करण्यात आल्याची माहिती संक्षिप्त स्वरुपात सादर करण्यात येत आहे.

**दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स फेडरेशनतर्फे महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केलेल्या नागरी सहकारी बँकांकरिता आयोजित सन २०१९ चा 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' वितरण सोहळा**

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनतर्फे दि.२४ सप्टेंबर,२०१९ रोजी भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा येथे आयोजित केलेल्या 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार - सन २०१९' या वितरण कार्यक्रमास राज्यातील विविध नागरी सहकारी बँकांच्या सुमारे ५०० हून अधिक प्रतिनिधींच्या उपस्थितीत फेडरेशनचे अध्यक्ष **मा. श्री. विद्याधर अनास्कर**, प्रमुख पाहूणे - राज्य सहकारी निवडणूक आयुक्त **मा. डॉ. जगदिश पाटील**, यांच्या शुभहस्ते सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या नागरी सहकारी बँकांना सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

महाराष्ट्रातील सभासद नागरी सहकारी बँकांमधून 'उत्कृष्ट काम' करणाऱ्या बँकांची निवड करण्याकरिता, फेडरेशनतर्फे समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने ठरविलेल्या निकषांनुसार

फेडरेशनला प्राप्त झालेल्या सुमारे ११५ हून अधिक अर्जांतून २१ विजेत्या सभासद नागरी सहकारी बँकांची सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.



'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' सोहळयास फेडरेशनचे माननीय संचालक तसेच पुरस्कार विजेत्या नागरी सहकारी बँकांचे मा.पदाधिकारी व संचालक आवर्जून उपस्थित राहील्याबद्दल फेडरेशनचे उपाध्यक्ष मा. श्री. रमाकांत खेतान यांनी फेडरेशनच्यावतीने त्यांचे आभार मानले. सदर सोहळयाचे सूत्रसंचालन फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव मा.सौ. सायली भोईर यांनी केले.

★★★★

**प्रशिक्षण कार्यक्रम -**

**वर्षभरात फेडरेशनने सभासद बँकांचे पदाधिकारी, व्यवस्थापन व कर्मचारी वर्ग यांचेकरिता खालीलप्रमाणे प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते.**

१) फेडरेशनने आपल्या सभासद नागरी सहकारी बँकांमधील मुख्य कार्यकारी अधिकारी, उपप्रमुख तथा सहाय्यक व्यवस्थापक तथा इतर व्यवस्थापक वर्गासाठी दि. २९/०६/२०१९ रोजी 'Credit Appraisal & Monitoring' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून रिझर्व्ह बँकेच्या मा. उप महाव्यवस्थापक सहकारी बँक पर्यवेक्षण विभागाचे मा. उप महाव्यवस्थापक डॉ. अजित कुमार यांना Principles of Lending, Credit Appraisal from RBI's Point of View, Role of CICs in Credit Appraisal, Credit Monitoring, End use of fund, Importance of Credit Policy या विषयांवर, तसेच दि कॉसमॉस को-ऑप.बँकेचे मा. उप महाव्यवस्थापक श्री. विश्राम दिक्षित यांनी Types of Borrowers, Effective understanding of Financial Statements and Ratio analysis, Different Types of Securities, Different Ways of Charging the Securities, Stock Audit Tool, Controlling SMA Accounts, Preventive Monitoring System & Profitability Relationship या विषयांवर मार्गदर्शन केले. सदरच्या प्रशिक्षण वर्गास एकूण ३२ बँकांचे ६२ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



२) फेडरेशनने दि.२७/०७/२०१९ रोजी नागरी सहकारी बँकांतील मुख्य अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी यांचेकरिता 'KYC Guidelines & Management या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण वर्गामध्ये व्याख्याते म्हणून रिझर्व्ह बँकेचे

मा.व्यवस्थापक श्री.प्रियंवद यादव यांनी Importance and Elements of KYC, Important Provisions in the Master Direction on KYC Guidelines, Money Laundering, Risk Management, Preservation of Records, Commonly observed irregularities in supervision of UCBs with focus on KYC and Corporate Governance या विषयांवर, तसेच RBL बँकेच्या KYC & AML विभागाच्या Vice President सुश्री. अमिता आजगांवकर यांनी Risk Categorization & Enhanced Due Diligence, Reporting to FIU-IND, Obligation of the Banks as Reportees, Identification of Beneficial Ownership, Identification and Monitoring of Suspicious Transactions, Red Flag Alerts, Re - KYC या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. सदरच्या प्रशिक्षण वर्गास एकूण २५ बँकांचे ६४ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



३) फेडरेशनतर्फे नागरी सहकारी बँकांकरिता दिनांक ०२/११/२०१९ रोजी 'SARFAESI Act 2002' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षण वर्गास बँकिंग तज्ञ श्री.मोहन किनिंगे यांनी 'Important Provisions under SARFAESI Act, 2002, Drafting of replies to Borrowers', Advocates' objection letters, Precaution to be taken while taking Peaceful, Symbolic & Physical Possessions, Handling of Stressful Situations, Practical action points for Authorized officers/BMs/SROs, Practical tips and tacts to handle the critical borrowers, Prevention of atrocity and molestation cases by borrowers, Sale notice to borrower, Auction notice, Precaution to be taken while conducting auctions, Sale of Assets acquired through Symbolic Possessions, Sale by Private Treaty, Appropriation of Sale Proceeds, Fraud Cases & Multiple Financing to same Assets, Do's and Don'ts under SARFAESI, How to handle DRT/Securitization application of borrowers u/s 17?, Precautions & Remedies' या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. सदरच्या प्रशिक्षण वर्गास एकूण ४० बँकांचे ७१ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

४) फेडरेशनतर्फे मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे जिल्ह्यातील सभासद नागरी सहकारी बँकांमधील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, सरव्यवस्थापक, उप-सरव्यवस्थापक व कर्मचारी वर्गासाठी दिनांक २३ डिसेंबर २०१९ रोजी ATAL PENSION YOJANA या केंद्र सरकारच्या योजनेसंदर्भात सविस्तर माहिती देण्यासाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता.

या प्रशिक्षण वर्गास पेन्शन फंड-नियामक आणि विकास प्राधिकरण (PFRDA) चे मा. मुख्य महाव्यवस्थापक श्री. आशिष कुमार यांनी 'Background & Introduction of Atal

Pension Yojana, Objectives of Atal Pension Yojana' या विषयांवर तसेच मा. व्यवस्थापक श्री. आशिष डोंगरे यांनी 'Need of Old Age Income, Objectives and Eligibility Criteria for Atal Pension Yojana, Benefits of the Atal Pension Yojana, Scheme's Incentives Structure for Banks' and Banks' customers, Process of registration with PFRDA for promoting APY' या विषयांवर महत्त्वपूर्ण माहिती प्रदान केली. तद्नंतर नॅशनल सिक्युरिटीज डिपॉजिटरी लिमिटेड (NSDL) चे मा.व्यवस्थापक श्री.कौस्तुभ वैद्य यांनी Introduction of NSDL (National Securities Depository Limited) w.r.t. CRA, Operative Procedures and role of NSDL, Registration process with NSDL, Requirement to operationalize APY at Bank, Subscribers' Registration Process या विषयांवर मार्गदर्शन केले. सदरच्या प्रशिक्षण वर्गास एकूण ३७ बँकांचे ६० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

वरील सर्व प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित प्रशिक्षणार्थींनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे, समस्यांचे समाधानकारक निवारण मा. व्याख्यात्यांनी केले.

★★★★

**राज्यस्तरीय परिषद**

रिझर्व्ह बँकेने देशातील ४थ्या क्रमांकावर असलेल्या पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को-ऑप.बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन त्या बँकेवर 'प्रशासकाची' नियुक्ती केली. साहजिकच या बँकेवर व त्यानुषंगाने इतर बँकांवर निर्माण झालेली Run सदृश्य स्थिती, त्याचे समस्त नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रावर झालेले व होणारे परिणाम, त्यावरील उपाययोजना, रिझर्व्ह बँक, राज्य व केंद्र शासन यांचा सहकारी बँकिंग क्षेत्राकडे पहाण्याचा दृष्टीकोन, सहकारी बँकिंगचे क्षेत्र अडचणीत असल्याचे चित्र उभे करण्याचा समाजातील काही घटकांकडून जाणीवपूर्वक केला जाणारा प्रयत्न, त्यासंदर्भातील वस्तुस्थिती, त्यास जबाबदार असणारे घटक व उपाययोजना, नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राला असणारी अष्टावधानी संचालक मंडळाची गरज व परिणामकारक व्यवस्थापन इ. महत्त्वाच्या विषयांवर सर्वसमावेशक चर्चा विनिमय करुन सहकारी बँकांच्या अस्तित्वासाठी व प्रगतीसाठी काही ठोस पावले उचलणे आवश्यक असल्याने त्यानुषंगाने पुढील दिशा ठरविण्याकरिता दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स् फेडरेशनतर्फे महाराष्ट्रातील सर्व नागरी सहकारी बँका व जिल्हा/विभागीय असोसिएशन्स्मधील संचालक व व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांकरिता **दि.१८ डिसेंबर,२०१९** रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे **'राज्यस्तरीय नागरी सहकारी बँकिंग परिषद-२०२०'** चे आयोजन करण्यात आले होते.

या परिषदेस, भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक **मा.श्री.सतिशजी मराठे**, राज्याचे सहकार आयुक्त **मा.श्री.सतिशजी सोनी**, नॅफकबचे अध्यक्ष **मा.श्री.ज्योतिंद्रजी मेहता** तथा फेडरेशनचे **मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व संचालक मंडळ** तसेच सहकार क्षेत्रातील इतर मान्यवर तथा तज्ञ मंडळीची उपस्थिती लाभली होती.

महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी बँका व जिल्हा / विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनचे समस्त संचालक, पदाधिकारी तसेच अन्य असे सुमारे ८०० हून अधिक प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले होते.

परिषदेतील आपल्या अध्यक्षीय भाषणात, फेडरेशनचे अध्यक्ष **मा.श्री. अनास्करजी** म्हणाले की, आज सहकारी बँकांच्या संचालक मंडळातील दुहीमुळे अनेक बँका अडचणीत आल्या आहेत. अनेक बँकांची प्रगती खुंटली आहे, तर दुसरीकडे रिझर्व्ह बँक नागरी सहकारी बँकांवर एकामागून एक कडक निर्बंध लादून समस्त सहकारी बँकिंग क्षेत्रच संपवण्याचा डाव आखत आहे.




रिझर्व्ह बँकेच्या या दुटप्पी धोरणामुळे आज क्षेत्रापुढे नागरी सहकारी बँकांवर दुहेरी नियंत्रण असावे का? ठेव विमा महामंडळास जोखीम भार आधारित ठेवींवर विमा हप्ता वसुल करावयास परवानगी द्यावी का? बड्या सहकारी बँकांना सक्तीने खाजगी बँकामध्ये रुपांतरीत व्हायला लावायचे का? असे अनेक विषय आहेत. तरी या परिषदेत उपस्थित असणाऱ्या नागरी सहकारी बँकांच्या प्रत्येक प्रतिनिधींनी या विषयांवर आपली मते मांडावीत, त्यावर साधक-बाधक चर्चा करावी व नागरी सहकारी बँकांचे पालकत्व स्वीकारलेली संघीय संस्था या नात्याने फेडरेशन जी भुमिका घेईल त्यास सर्वानुमते पाठिंबा द्यावा असे आवाहन शेवटी मा.अध्यक्षांनी उपस्थितांना केले. मा.अध्यक्षांनी केलेल्या या आवाहनास उपस्थित बँक प्रतिनिधींनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

तद्नंतर परिषदेचे सन्माननीय अतिथी व रिझर्व्ह बँकेचे संचालक **मा.श्री.सतिशजी मराठे** सभेस संबोधून म्हणाले की, रिझर्व्ह बँकेच्या मते त्यांना नागरी सहकारी बँकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पुरेसे अधिकार नाहीत. त्यामुळे रिझर्व्ह बँकेकडून आगामी काळात या सहकारी बँकांना बोर्ड ऑफ मॅनेजमेंट स्वीकारायला लावणे, मोठ्या बँकांचे खाजगीकरण, इतर नागरी सहकारी बँकांना प्रथमत: स्मॉल फायनान्स बँकेचे निकष लावून नंतर खाजगीकरणाकडे वळवण्याचा पर्याय स्वीकारायला लावले जाणे इ.करिता प्रयत्न केले जातील.

तरी नागरी सहकारी बँकांनी आगामी काळात येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सज्ज रहावे असे आवाहन त्यांनी अंतिमत: परिषदेस उपस्थित प्रतिनिधींना केले.

यानंतर राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक, **मा.श्री.सतिशजी सोनी** यांनी सभागृहास संबोधित करताना भाष्य केले की, ९७ व्या घटना दुरुस्तीनंतर नागरी सहकारी बँकांच्या प्रशासकीय कामकाजात सुलभता व गतीमानता यावी याकरिता सहकार खात्याने कात टाकली असून अनेक सुधारित परिपत्रके सहकारी बँकांकरिता जारी करण्यात आली आहेत. नागरी सहकारी बँकांमध्ये व्यावसायिकता असली तरी रिझर्व्ह बँकेला अपेक्षित असलेली व्यावसायिकता आपण स्वीकारली पाहिजे. त्यामुळे व्यावसायिक

संचालकांनी आपले कामकाज अधिक लोकाभिमुख कसे होईल हे देखील पाहिले पाहिजे. त्याचबरोबर ज्या बँकांमध्ये व्यावसायिक गैरव्यवहार, घोटाळे होत आहेत तिथे दोषींवर निश्चितच कठोर कारवाई केली जाईल याचे संकेत त्यांनी या परिषदेच्या माध्यमातून दिले.

यानंतर नॅफकबचे अध्यक्ष **मा.श्री.ज्योतिंद्रजी मेहता** यांनी आपल्या भाषणात अंब्रेला ऑर्गनायझेशन स्थापन करणेसंदर्भात माहिती प्रदान केली. तद्नंतर कॉर्पोरेट कंपन्यांना आकारण्यात येणाऱ्या आयकरात केंद्र सरकारने सवलत दिली असून नागरी सहकारी बँकांना मात्र अद्यापही ३३% ने आयकर भरावा लागत असल्याने हा अन्याय दूर झाला पाहिजे आणि याकरिता सर्व राज्यस्तरीय संघांनी मा.केंद्रीय अर्थमंत्र्यांशी पत्रव्यवहार करावा अशी विनंती देखील त्यांनी याप्रसंगी केली.

परिषद आयोजित करण्यामागच्या मा.अध्यक्षांच्या प्रास्ताविक भाषणानंतर तसेच सन्माननीय अतिथीच्या मार्गदर्शनपर प्रबोधनानंतर या परिषदेच्या चिंतन बैठकीपुढे विविध विषय सादर करण्यात आले व त्यावर परिषदेस उपस्थित नागरी सहकारी बँकांच्या संचालकांनी, व्यवस्थापकीय कार्यकारी अधिकारी तसेच तज्ञ मंडळींनी साधक-बाधक चर्चा करुन त्यानुषंगाने ठराव संमत केले.

कार्यक्रमाच्या शेवटी या परिषदेस मा.सन्माननीय अतिथी, विशेष आमंत्रित, सहकार क्षेत्रातील इतर मान्यवर व तज्ञ मंडळी तसेच समस्त नागरी सहकारी बँकांचे व जिल्हा/विभागीय बँक्स् असोसिएशन्स्चे मा. पदाधिकारी व संचालक आवर्जून उपस्थित राहील्याबद्दल फेडरेशनचे उपाध्यक्ष **मा.श्री.रमाकांत खेतान** यांनी त्यांचेप्रति आभार व्यक्त केले.

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनने आयोजित केलेल्या **'राज्यस्तरीय नागरी सहकारी बँकिंग परिषद-२०२०'** या संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचलन फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव **सौ.सायली भोईर** यांनी यशस्वीरित्या केले.

★★★★

**सहकारी बँकिंग क्षेत्राच्या अस्तित्वासाठी व सक्षमीकरणासाठी 'विनंती आंदोलन' :-**

पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को-ऑप.बँकेमध्ये घडलेल्या गुन्हेगारी घटनेच्या पार्श्वभुमीवर रिझर्व्ह बँकेने संपूर्ण नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राबाबत कडक धोरण स्वीकारत सहकारातील किड नष्ट करणेऐवजी सहकारालाच संपविण्याच्या उद्देशाने त्यांच्यावर अनेक कडक निर्बंध लादले आहेत. सकृतदर्शनी जरी हे निर्बंध नागरी सहकारी बँकांच्या कर्जामधील धोके कमी करण्याकरिता प्रस्तावित केलेले आहेत असे वाटत असले तरी रिझर्व्ह बँकेचा या मागचा मूळ उद्देश हा नागरी सहकारी बँकांना खाजगीकरणाकडे वळवण्याचा आहे, हे स्पष्टपणे दिसून येत आहे. कारण या निर्बंधानंतर रिझर्व्ह बँकेच्या या दबावाला बळी पडत मुंबईस्थित एका नागरी सहकारी बँकेने लगेचच वर्तमान पत्रामध्ये आपल्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना देत, बँकेचे व्यापारी बँकेत रुपांतर करण्याचा विषय आणला. तसेच दि.६ जानेवारी,२०२० रोजी उत्तर प्रदेशमधील शिवालीक सहकारी बँकेस त्यांच्या व्यापारीकरणास रिझर्व्ह बँकेने तत्वत: (in principle) मंजुरी दिल्याचे जाहीर झाल्याने रिझर्व्ह बँक 'नियामक' म्हणून आपल्या दबावतंत्राचा वापर करत संपूर्ण नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रच संपविण्याचा कट रचत असल्याच्या शंकेस पुष्टी मिळाली.

परिणामी सहकारी बँकिंग क्षेत्राच्या निकोप व सक्षम वाढीसाठी कटिबध्द असलेल्या फेडरेशनने काही स्वार्थी व नीतीमत्ताहीन व्यक्तींकडून सहकारात होणारा अधिक्षेप मोडून काढण्यासाठी, या क्षेत्रातील सर्वांना बरोबर घेऊन ठोस उपाययोजना करण्यासाठी, तसेच सहकारी बँकिंग क्षेत्राला होऊ पाहणारी

व्यापारीकरणाची लागण थांबविण्यासाठी **दि.१८ जानेवारी,२०२०** रोजी संबंधित बँकेच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या ठिकाणी त्या बँकेच्या सभासदांना सहकाराचे महत्त्व पटवून देण्यासाठी व त्यांना व्यापारीकरणाच्या निर्णयापासून परावृत्त करण्यासाठी फेडरेशनच्या मा.संचालक व सहकारातील निष्ठावंत कार्यकर्त्यांकडून **विनंती आंदोलनाचे** आयोजन करण्यात आले होते.

★★★★

**टॅफकॅब**

भारतीय रिझर्व्ह बँकेने महाराष्ट्रासाठी निर्माण केलेल्या स्टेट लेवल टास्कफोर्सच्या मुंबई विभागासाठी होणाऱ्या सभांना फेडरेशनचे विद्यमान अध्यक्ष **मा.श्री.विद्याधर अनास्कर**, तर नागपूर विभागासाठी होणाऱ्या सभांना फेडरेशनचे विद्यमान संचालक **मा.श्री.सतिश गुप्ता** तसेच बहुराज्यीय नागरी सहकारी बँकांसाठी असलेल्या टॅफकबच्या सभांसाठी फेडरेशनचे विद्यमान संचालक **मा.श्री. सि.बा.आडसूळ** हे उपस्थित राहून नागरी सहकारी बँकांना न्याय मिळवून देण्याकरिता प्रयत्नशील असतात. त्याकरिता टॅफकबवरील बँकांची पूर्वसभा बोलावून बँकांच्या समस्या जाणून घेऊन त्या टॅफकब समितीसमोर फेडरेशनच्या संचालकांमार्फत मांडल्या जातात. अशा वेळी या बँकांना त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता अथवा या बँकांच्या विनंतीवरुन विलीनीकरणाकरिता मोलाचे मार्गदर्शन देखील वेळोवेळी फेडरेशनतर्फे केले जाते.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या मुंबई विभागातर्फे २ सभा, नागपूर विभागातर्फे ३ सभा, तथा केंद्रीय विभागातर्फे बहुराज्यीय नागरी सहकारी बँकांसाठी १ सभा घेण्यात आली.

★★★★

**सभासदत्व**

अहवाल सालात पुणे सहकारी बँक लि., पुणे व इचलकरंजी मर्चंटस् को-ऑप. बँक, कोल्हापूर या २ बँकांनी फेडरेशनचे सभासदत्व स्वीकारले, मात्र या कालावधीत जनता को-ऑप. बँक, खामगांव या बँकेचे दि चिखली अर्बन को-ऑप. बँक या बँकेत आणि आर.एस.को-ऑप. बँक, मुंबई या बँकेचे मेहसाना अर्बन को-ऑप. बँक, मेहसाना या बँकेत विलीनीकरण झाल्याने दिनांक ३१ मार्च,२०२० अखेर ४८२ नागरी सहकारी बँका, १ सहयोगी सभासद व १८ नागरी सहकारी बँकांची विभागीय/जिल्हा असोसिएशन्स मिळून फेडरेशनची एकूण सभासद संख्या ५०१ झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील ज्या नागरी सहकारी बँका अद्याप फेडरेशनच्या सभासद झालेल्या नाहीत त्यांना फेडरेशनचे सभासद होण्याचे आवाहन वेळोवेळी करण्यात येत आहे.

★★★★

**राष्ट्रीय पातळीवरील संस्था**

सभासद बँकाना मार्गदर्शन करत असताना आपली फेडरेशन, राष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी सलोख्याचे संबंध ठेवून आहे. सहकार, बँकिंग व व्यापार उदीम क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील खालील संस्थांची फेडरेशन सभासद आहे.

- नॅशनल को-ऑप.युनियन ऑफ इंडिया, नवी दिल्ली.
- नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑप.बँक्स अ‍ॅन्ड क्रेडीट सोसायटीज लि., नवी दिल्ली.

- इंडियन मर्चन्टस चेंबर, मुंबई.
- इंडियन बँक्स् असोसिएशन, मुंबई.
- इंडियन इन्स्टिटयुट ऑफ बँकिंग ॲण्ड फायनॅन्स्, मुंबई.

वरील मान्यवर संस्थांकडून आलेली माहिती फेडरेशनच्या सर्व सभासद बँकांना वेळोवेळी वितरीत केली जाते.

★★★★

**विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**

फेडरेशन MBA आणि Ph.D. करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा बँकिंग आणि सहकार विषयक प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यास सर्वतोपरी मदत करीत असते. राज्याच्या विविध भागातून, जिल्ह्यांमधून भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक बाबी, सहकारी बँकांचा इतिहास आणि अलीकडील बँकिंग क्षेत्रातील घडामोडी इ. बाबत माहिती जाणून घेण्यासाठी अनेक विद्यार्थी फेडरेशनशी संपर्क साधत असतात किंवा कार्यालयास भेटी देत असतात.

★★★★

**नागरी बँक वार्तापत्र**

महाराष्ट्रातील सर्व नागरी सहकारी बँकांसाठीचे एकमेव **'नागरी बँक वार्तापत्र'** हे त्रैमासिक गेल्या तीन दशकांपेक्षा अधिक काळाहून सभासद नागरी सहकारी बँकांना/असोसिएशन्स् यांना विनामुल्य फेडरेशनतर्फे पाठविण्यात येत असते. या त्रैमासिक वार्तापत्रात भारतीय रिझर्व्ह बँकेची परिपत्रके, सहकार खात्याची परिपत्रके, महाराष्ट्र शासनाचे अध्यादेश, शासन निर्णय, भारत सरकारची राजपत्रके, नागरी सहकारी बँकांना येणाऱ्या अडचणींचे न्याय-निवाडयासंदर्भातील किस्से, सभासद बँकांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी उच्च पातळीवरील मान्यवरांच्या भेटीचा वृत्तांत, भारतीय रिझर्व्ह बँकेशी होणाऱ्या स्थायी सल्लागार समितीच्या सभांचा आढावा, टॅफकबमधील सभासद बँकांनी घ्यावयाची दक्षता व मार्गदर्शन, सभासद बँकांनी केलेल्या कामगिरीचा गौरव वृत्तांत, सहकारी बँकांतील मान्यवरांचा अभिनंदनपर उल्लेख व सध्याच्या बँकिंग क्षेत्रातील घडामोडीबाबतची अद्ययावत माहिती आवर्जून या वार्तापत्रात प्रसिध्द करण्यात येत असते.

★★★★

अहवाल वर्षातील ठळक घडामोडीवरुन आपल्या निदर्शनास आले असेलच की, नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीकरिता फेडरेशन सदैव सक्रिय राहीलेली आहे आणि म्हणूनच ती खऱ्या अर्थाने नागरी सहकारी बँकांचे पालकत्व स्वीकारलेली राज्यस्तरीय संघीय संस्था म्हणून गणली जाते. गेल्या वर्षभरात ई-मेलच्या माध्यमातून तथा लेखी पत्रांद्वारे नागरी सहकारी बँकांनी त्यांच्या समस्या, अडचणी प्रश्नरुपाने फेडरेशनला सादर केल्या व त्याची त्वरीत दखल घेऊन फेडरेशनही त्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी तत्पर राहीली आहे.

फेडरेशनच्या या आर्थिक वर्षातील कामगिरीनंतर मी फेडरेशनने केलेल्या आर्थिक प्रगतीचा मुद्देसूद तपशील आपणांसमोर सादर करीत आहे.

## आर्थिक प्रगतीचा आलेख

### हिशेब पत्रके

सन २०१९-२० या आर्थिक सालासाठी फेडरेशनच्या जिंदगी व देयता तसेच उत्पन्न व खर्चाचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

**जिंदगी व देयता:** (रु.लाखात)

| **जिंदगी** | **३१/०३/२०१९** | **३१/०३/२०२०** |
|---|---|---|
| रोख व बँकांमधील शिल्लक | १२.२१ | ७८.७७ |
| गुंतवणूक | ५०७.९० | ५२८.८५ |
| फिक्सड ॲसेटस् | १८.५२ | १६.६३ |
| प्रिमीअम ऑन लिज्ड् प्रिमायसेस | ३०.०० | ३०.०० |
| संकीर्ण येणी | ६५.२५ | ८१.८८ |
| **एकूण** | **६३३.८८** | **७३६.१३** |

| **देयता** | **३१/०३/२०१९** | **३१/०३/२०२०** |
|---|---|---|
| राखीव निधी | ९०.६७ | ९२.५२ |
| इमारत आणि विकास निधी | २८७.१० | ३०३.६० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी फंड | ६६.५९ | ८१.६३ |
| कर्मचारी रजा रोखीकरण निधी | ३०.८८ | ४२.५१ |
| अमोरटायझेशन फंड | १३.७५ | १४.२५ |
| अनपेक्षित देणी फंड | ३८.५० | ५५.०० |
| स्टाफ वेलफेअर फंड | २०.४४ | ३०.४४ |
| गुंतवणूकीकरिता खास निधी | ०.०० | १६.०० |
| बृहन्मुंबई ना.सह.बँक्स् असोसिएशनकडून मिळालेले प्रिमियम | ७.४५ | ७.४५ |
| चालू देणी व तरतुदी | ७१.१४ | ८४.७३ |
| एकूण वाढावा | ७.३६ | ८.०० |
| **एकूण** | **६३३.८८** | **७३६.१३** |

**उत्पन्न व खर्च** (रु.लाखात)

| **उत्पन्न** | **३१/०३/२०१९** | **३१/०३/२०२०** |
|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | ९५.८० | १०३.५६ |
| गुंतवणूकीवर मिळालेले व्याज | ४०.४९ | ४५.१२ |
| इतर उत्पन्न | १९.०७ | ४४.८४ |
| **एकूण** | **१५५.३६** | **१९३.५२** |

| **खर्च** | **३१/०३/२०१९** | **३१/०३/२०२०** |
|---|---|---|
| प्रशासकीय खर्च | ५८.८० | ५३.८८ |
| कार्यालयीन खर्च | ९.३१ | ९.४५ |
| फी, कमिशन | १.९१ | २.४१ |
| घसारा | २.४२ | २.३५ |
| मालमत्ता खर्च (भाडे, कर, विमा इ.) | ६.५९ | ५.७३ |
| इतर खर्च | १३.९७ | २५.७० |
| विविध निधीमध्ये वर्ग | ५५.०० | ८६.०० |
| खर्च वजा जाता वाढावा | ७.३६ | ८.०० |
| **एकूण** | **१५५.३६** | **१९३.५२** |

| | ३१/०३/२०१७ अखेर | ३१/०३/२०१८ अखेर | ३१/०३/२०१९ अखेर | ३१/०३/२०२० अखेर |
|---|---|---|---|---|
| **उत्पन्न** | १४८.३६ | १६८.६० | १५५.३६ | १९३.५२ |
| **खर्च** | १४१.७१ | १६१.९७ | १४८.०० | १८५.५२ |
| **वाढावा** | ६.६५ | ६.६३ | ७.३६ | ८.०० |

सभासद बँकांकडून वसूल करण्यात आलेली थकीत वार्षिक वर्गणी, फेडरेशनने विविध बँकांमधील ठेवींमध्ये केलेली गुंतवणूक, प्रशिक्षण व प्रायोजकत्वाद्वारे मिळालेल्या निधीमुळे व त्याचबरोबर प्रशासकीय खर्चात केलेल्या काटकसरीमुळे फेडरेशनला दि.३१ मार्च, २०२० अखेर एकूण रु.१९३.५२ लाखाचे उत्पन्न प्राप्त झालेले असून गतवर्षीपेक्षा सदर उत्पन्नात २५% पर्यंत वाढ झालेली आहे. सदर उत्पन्नातून इतर खर्च व तरतूदी वजा जाता फेडरेशनला ९४.०० लाखांचा वाढावा प्राप्त झालेला आहे. गेल्या ४० वर्षातील हे फेडरेशनचे सर्वाधिक व विक्रमी उत्पन्न व नफा आहे. फेडरेशनला प्राप्त झालेल्या एकूण वाढाव्यातून सुमारे ८६.०० लाखाची रक्कम विविध निधीमध्ये वर्ग करण्यात येऊन निव्वळ वाढावा रु.८.०० लाख इतका शिल्लक राहिलेला आहे. फेडरेशनची गुंतवणूक व ठेवींची रक्कम रु.५०७.९० लाखावरुन ५२८.८५ लाख झाली आहे. तसेच राखीव तथा इतर निधीमध्ये १६% हून अधिक वाढ झालेली असून मार्च, २०२० अखेर राखीव व इतर निधी सुमारे रु.६३५.९५ लाख आहे.

★★★★

**वाढावा विभागणी**

दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाअखेर फेडरेशला प्राप्त झालेल्या उत्पन्नातून खर्च व तरतुदी वजा जाता शिल्लक राहिलेला वाढावा व त्यात गतवर्षीचा उरलेला वाढावा मिळविता एकूण रु.८,००,३०६.१४ पैसे फक्त वाढाव्याच्या स्वरुपात शिल्लक राहिले आहेत. सदर वाढाव्याची खालीलप्रमाणे विभागणी करण्यात आली असून त्यास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. तरी सदर वाढावा विभागणीस कार्योत्तर मंजूरी देण्याची विनंती सभासदांना करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| राखीव निधी २५% | ₹ | २,००,१००.०० |
| इमारत आणि विकास निधी | ₹ | २,००,०००.०० |
| अनपेक्षित देणी निधी | ₹ | १,००,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | ₹ | १,५०,०००.०० |
| रजा रोखीकरण निधी | ₹ | १,५०,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | ₹ | २०६.१४ |
| एकूण | ₹ | ८,००,३०६.१४ |

**संचालक मंडळ सभा**

अहवाल सालात संचालक मंडळाच्या ५ सभा व उपसमितीच्या २ सभा घेण्यात आल्या. सदर सभांमध्ये नागरी सहकारी बँकांच्या विविध प्रश्नांसंबंधी चर्चा करुन निर्णय घेण्यात आले. मा.संचालकांनी आपले यथोचित योगदान या सभांद्वारे प्रदान केले.

★★★★

**लेखापरिक्षण**

फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०१९-२० करिता अंतर्गत लेखापरिक्षण करण्यासाठी **मेसर्स नेवरेकर ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** यांची **'अंतर्गत लेखापरिक्षक'** म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी दि.१८/०९/२०२० रोजी अंतर्गत लेखापरिक्षण करुन आपला अहवाल कार्यालयास सादर केला आहे.

तसेच वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी शासन मान्यताप्राप्त पॅनेलवरील 'अ' गटातील **मेसर्स एस.डी.साटम ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** यांची **'वैधानिक लेखापरिक्षक'** म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी दि.१९/०९/२०२० रोजी आपला वैधानिक लेखापरिक्षण अहवाल कार्यालयास सादर केला आहे.

मा.वैधानिक लेखापरिक्षक **मेसर्स एस.डी.साटम ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** यांनी सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी फेडरेशनला लेखापरिक्षण वर्ग **'अ'** दिलेला आहे. त्यांनी फेडरेशनच्या कामकाजामध्ये लेखापरिक्षणाच्या आधारे बहुमोल मार्गदर्शन करुन फेडरेशनच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्याबद्दल फेडरेशनतर्फे त्यांचे व त्यांच्या सहकारी वर्गाचे मन:पूर्वक आभार.

★★★★

**कर्मचारी वर्ग**

फेडरेशनच्या सेवेत एक हिशेबनीस, तीन लिपीक, एक रिसेप्शनीस्ट, दोन शिपाई व एक ड्रायव्हर इतका कर्मचारी वर्ग असून **मा.सौ.सायली भोईर** या फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव म्हणून काम पाहतात.

★★★★

**अभिनंदन**

❖ कोविड १९ च्या लॉकडाऊनमुळे राज्यातील सर्व सहकारी संस्थांवर होणारे दूरगामी परिणाम व त्यावरील उपाययोजना याबाबत अभ्यास करुन शासनाला अहवाल सादर करण्यासाठी राज्याच्या सहकार विभागाने दि महाराष्ट्र राज्य अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनचे अध्यक्ष मा.श्री.विद्याधर अनास्कर यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यांची समिती गठीत केली असल्याची माहिती सभेस दिली. सदर समितीच्या **अध्यक्षपदी श्री.अनास्कर साहेब**, तसेच सदस्यपदी सहकार तज्ञ व दापोली अर्बन बँकेचे अध्यक्ष **मा. श्री. जयवंत जालगांवकर** यांची **'समिती सदस्य'** म्हणून नियुक्ती झाली आहे.

❖ राज्यातल्या सहकाराला पतपुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक या प्रमुख शिखर बँकेने गेल्या आर्थिक वर्षात उच्चांकी वार्षिक उलाढाल, उच्चांकी नफा, शून्य टक्के एनपीए मिळवत १०९ वर्षातला इतिहास घडवला आहे. सहकारातल्या या शिखर बँकेने अवघ्या तीन वर्षात यशाचे

शिखर गाठल्याबद्दल बँकेच्या प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष **मा.श्री.विद्याधर अनास्कर** यांचा मंत्री समितीच्या झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री **मा.श्री.उद्धव ठाकरे** यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला.

**फेडरेशनच्या परिवारातर्फे त्यांचे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन!**

★★★★

**भावपूर्ण श्रद्धांजली**

अहवाल सालात खालील मान्यवर, प्रतिष्ठित व्यक्तींना देवाज्ञा झाली. त्यांना फेडरेशनच्या परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

❖ पद्मविभूषण तसेच भारतरत्न पुरस्कार विजेते देशाचे माजी राष्ट्रपती **प्रणव मुखर्जी** यांचे निधन झाले.

❖ महाराष्ट्राचे दहावे माजी मुख्यमंत्री **शिवाजीराव निलंगेकर पाटील** यांचे निधन झाले.

❖ ज्येष्ठ वकील आणि माजी केंद्रीय मंत्री **राम जेठमलानी** यांचे निधन झाले.

❖ दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनचे विद्यमान ज्येष्ठ संचालक व माजी अध्यक्ष **बाळासाहेब उर्फ दामोदर कृष्णाजी माजगांवकर** यांचे निधन झाले.

❖ दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनचे माजी संचालक **वसंत मेहेंदळे** आणि **माधवराव पाटील** यांचे निधन झाले.

❖ मराठी आणि हिंदी नाट्यसृष्टी तसेच चित्रपटसृष्टीतील आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर रंगभूमी, सिनेसृष्टी गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते **डॉ.श्रीराम बाळकृष्ण लागू** तसेच प्रेमळ व्यक्तिमत्त्व व कसदार अभिनयाने रंगभूमी, विविध मालिका, मराठी तसेच हिंदी सिनेसृष्टीत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री **आशालता वाबगांवकर** यांचे निधन झाले.

❖ ज्येष्ठ शास्त्रीय गायिका **सुनंदा पटनायक** यांचे निधन झाले.

❖ ग्रामीण स्त्रियांमध्ये आत्मभान जागृत करणाऱ्या बोइंग टुगेदर या प्रकल्पाच्या प्रकल्प प्रमुख तसेच ज्येष्ठ मराठी लेखिका व संपादिका **डॉ. विद्या बाळ** तसेच प्रख्यात मराठी लेखिका आणि आचार्य अत्रे उर्फ प्र.के.अत्रे यांच्या कन्या **मीना देशपांडे** यांचे निधन झाले.

❖ बॉलिवूडचे सदाबहार, बहुआयामी, प्रसन्न प्रतिभावंत दिग्गज अभिनेते **ऋषी कपूर, इरफान खान, सुशांत सिंह राजपूत, जगदीप** यांचे निधन झाले.

❖ नाटक, एकांकिका, बालनाट्य, कथा, गूढकथा, कादंबरी, ललित लेख, वैचारिक साहित्य अशा साहित्य प्रकारात दर्जेदार लेखन करणारे साहित्यिक रंगकर्मी, दिग्दर्शक, निर्माता आणि चित्रकार **रत्नाकर मतकरी** यांचे निधन झाले.

❖ हिंदी चित्रपटसृष्टीचे दिग्दर्शक आणि पटकथा लेखक **बासू चटर्जी** यांचे निधन झाले.

❖ हिंदी सिनेसृष्टीत सुमारे पाच दशके गाजविलेल्या प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शिका **सरोज खान** यांचे निधन झाले.

❖ भारतीय शास्त्रीय संगीतातले मेवाती घराण्याचे गायक, तसेच केंद्रशासनाने संगीत क्षेत्रातील कामगिरीबद्दल इ.स.२००० साली पद्मविभूषण पुरस्कार देवून गौरविण्यात आलेले **पंडित जसराज** यांचे निधन झाले.

❖ एस.टी.महामंडळाचे माजी अध्यक्ष आणि पंढरपूरचे आधारवड **सुधाकरपंत परिचारक** यांचे निधन झाले.

❖ भारत-चीन सीमेवर गलवान खोरे येथे १६ जून २०२० रोजी चिनी सैनिकांसोबत झालेल्या हल्ल्यात **भारताचे २० जवान शहिद झाले**.

याशिवाय देशातील थोर नेते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, शिक्षणतज्ञ, बँकिंग व आर्थिक क्षेत्रातील प्रतिभावंत व्यक्ती, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, क्रीडा इ.क्षेत्रातील ख्यातीप्राप्त व लोकप्रिय व्यक्ती तसेच मार्च २०२० पासून संपूर्ण जगात थैमान घातलेल्या कोविड-१९ या साथीच्या रोगामुळे व नैसर्गिक आपत्तीमध्ये निधन पावलेल्या इतर ज्ञात-अज्ञात निरपराध दिवंगत व्यक्तींना फेडरेशनतर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात येत असून त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

★★★★

**आभार व ऋणनिर्देश**

अहवालसाली खालील व्यक्तींनी/संस्थांनी फेडरेशनच्या दैनंदिन कामकाजात मोलाचे सहाय्य व मार्गदर्शन केले.

राज्याचे मुख्यमंत्री **मा.श्री.उद्धव ठाकरे**, उपमुख्यमंत्री **मा.श्री.अजितदादा पवार**, महसूलमंत्री **मा.श्री.बाळासाहेब थोरात**, सहकारमंत्री **मा.श्री. बाळासाहेब पाटील**, सहकार राज्यमंत्री **मा. श्री.विश्वजीत कदम**, माजी केंद्रीय कृषी मंत्री व खासदार **मा.श्री.शरदचंद्रजी पवार**, सहकार विभागाच्या प्रधान सचिव **मा.श्रीमती आभा शुक्ला**, सहकार आयुक्त **मा.श्री.अनिल कवडे**, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण आयुक्त **मा.डॉ.जगदीश पाटील**, रिझर्व्ह बँकेच्या डिपार्टमेंट ऑफ को-ऑप.बँकिंग रेग्युलेशन या विभागाचे डेप्युटी गव्हर्नर **मा.श्री.एन.एस.विश्वनाथन**, कार्यकारी संचालिका **मा.श्रीमती लिली वडेरा**, मुख्य सरव्यवस्थापक **मा.श्री.निरज निगम**, रिझर्व्ह बँकेच्या डिपार्टमेंट ऑफ को-ऑप.बँकिंग सुपरव्हिजन या विभागाचे डेप्युटी गव्हर्नर **मा.श्री.एम.के.जैन**, कार्यकारी संचालक **मा.श्री.सौरभ सिन्हा**, मुख्य सरव्यवस्थापिका **मा.श्रीमती रिना बॅनर्जी** (केंद्रीय कार्यालय) तसेच मुंबई प्रादेशिक विभागाच्या मुख्य सरव्यवस्थापिका **मा.श्रीमती उमा शंकर**, रिझर्व्ह बँकेच्या नागपूर विभागाच्या विभागीय संचालिका **मा.सुश्री इंद्राणी बॅनजी**, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कृषी बँकिंग कॉलेजच्या प्रिन्सीपाल **मा.श्रीमती मधुमीता देव**, इंडियन बँक्स असोसिएशनचे मुख्य कार्यकारी, **मा.श्री.व्ही.जी.कन्नन**, नॅशनल फेडरेशनचे अध्यक्ष **मा.श्री.ज्योतिंद्र मेहता**, उपाध्यक्ष **मा.श्री.के. के.शर्मा**, नॅशनल को-ऑप.युनियन ऑफ इंडियाचे अध्यक्ष **मा.चंद्रपाल सिंग यादव**, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक **मा.डॉ.अजित देशमुख**, अपर आयुक्त व विशेष निबंधक **मा.डॉ. आनंद जोगदंड**, उपनिबंधक (अर्बन बँका) **मा.डॉ.आनंद कटके**, फेडरेशनचे वैधानिक लेखापरिक्षक **मा.श्री एस.डी.साटम**, चार्टर्ड अकौटंट, मुंबई व अंतर्गत लेखापरिक्षक **मा.श्री प्रितम नेवरेकर**, चार्टर्ड अकौटंट, मुंबई, तसेच फेडरेशनच्या यशस्वी वाटचालीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या संस्था व व्यक्ती, जिल्हा व विभागीय असोसिएशन्स, फेडरेशनच्या विविध उपक्रमास लोकाभिमुख करणारी प्रसिध्दी माध्यमे आणि त्यांचे प्रतिनिधी यांचे मी याप्रसंगी आभार मानतो.

फेडरेशनच्या अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळत असताना, सभासद नागरी सहकारी बँका/ जिल्हा-विभागीय असोसिएशन्सच्या पदाधिकाऱ्यांनी फेडरेशनला दिलेला सक्रिय पाठिंबा, सहकार्य तसेच फेडरेशनचे कामकाज करताना केलेल्या सूचना फेडरेशनला मार्गदर्शक ठरल्या आहेत. फेडरेशनची उद्दिष्टे नजरेसमोर ठेऊन सभासद बँकांच्या अडीअडचणी सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी तसेच माझ्या सहकाऱ्यांनी सातत्याने केला आहे, त्याचे फलित म्हणूनच आपल्या सर्वांच्या सहकार्याने फेडरेशन प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. ही जबाबदारी पेलताना प्रत्येक संचालकांनी दिलेल्या सहकार्याबरोबर विद्यमान उपाध्यक्ष **मा.श्री रमाकांत खेतान** यांनी दिलेली मोलाची साथ तसेच मुख्य कार्यकारी व सचिव **सौ.सायली भोईर** व **सेवक वर्ग** या सर्वांनी फेडरेशनचे कामकाज करण्यामध्ये मला उत्तम सहकार्य केले आहे, त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. आजवरचा हा विश्वास, जिव्हाळा, प्रेम व सहकार्य असेच कायम राहो ह्याच अपेक्षांसह फेडरेशनच्या सेवेसाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन पुनश्च देवून मी आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभासद बंधू-भगिनींनो, सन २०१९-२० च्या अहवालासंबंधातील माहितीचे विवेचन मी आतापर्यंत आपणांस या भाषणाच्या निमित्ताने सादर केले आहे. यानंतर विषय सूचीप्रमाणे दि.३१ मार्च,२०२० रोजीचे ताळेबंद पत्रक व आयव्यय पत्रक, आगामी वर्षाचे अंदाज पत्रक इत्यादींचा तपशील या अहवालात स्पष्टपणे नमूद केला आहे. आपणाकडे सादर केलेला अहवाल, आय-व्यय पत्रक, ताळेबंद पत्रक, वाढावा विभागणी आणि अंदाज पत्रक आपण स्वीकृत करावे तसेच फेडरेशनच्या सर्वांगीण प्रगतीकरिता आपण सर्वांनी सहकार्याचा हातभार लावावा ही नम्र विनंती.

जय हिंद । जय महाराष्ट्र । जय सहकार ।

**विद्याधर अनास्कर**
अध्यक्ष

★★★★

## दिनांक २४ सप्टेंबर,२०१९ रोजी झालेल्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँकांची व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्ची **४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२४ सप्टेंबर,२०१९** रोजी **दुपारी २:३०** वाजता 'भारतीय क्रीडा मंदिर, ४था मजला, नायगांव-वडाळा रोड, वडाळा, मुंबई-४०० ०३१' येथे संपन्न झाली. सदर सभेस खालील सभासद नागरी सहकारी बँकांचे व जिल्हा /विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्चे प्रतिनिधी उपस्थित होते.

| **प्रतिनिधींचे नाव** | **बँकेचे / असोसिएशन्स्चे नाव** |
|---|---|
| मा.श्री.विद्याधर अनास्कर | विद्या सहकारी बँक लि.पुणे |
| मा.श्री.रमाकांत खेतान | दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑप.बँक लि.अकोला |
| मा.श्री.आनंदराव अडसूळ | सिटी को-ऑप.बँक लि.मुंबई |
| मा.श्री.संदिप घनदाट | अभ्युदय को-ऑप.बँक लि.मुंबई |
| मा.श्री.ज्ञानेश्वर वांगडे | दि सातारा सहकारी बँक लि.मुंबई |
| मा.श्री.भास्करराव कोठावदे | दि ओझर मर्चन्टस् को-ऑप.बँक लि.ओझर |
| मा.श्री.अुत्तम जोशी | ठाणे भारत सहकारी बँक लि.ठाणे |
| मा.श्री.सुनिल देवडा | ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप.बँक लि.हिंगोली |
| मा.श्री.सतीश गुप्ता | दि चिखली अर्बन को-ऑप.बँक लि.चिखली |
| मा.श्री.जगदिश तुळजापूरकर | दि सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असो.लि.सोलापूर |
| मा. श्री कैलाशचंद्र अग्रवाल | दि विदर्भ अर्बन बँक्स् को-ऑप.असो.लि.नागपूर |
| मा.श्रीमती शोभाताई सावंत | दि अण्णासाहेब सावंत अर्बन को-ऑप.बँक महाड लि., महाड |
| मा.डॉ.शशीताई अहिरे | दि नासिक जिल्हा महिला सहकारी बँक लि.नासिक |
| मा.श्री.जयवंत जालगांवकर | दापोली अर्बन को-ऑप.बँक लि.दापोली |
| मा.श्री.अशोक शेळके | श्री स्वामी समर्थ सहकारी बँक लि.निघोज |
| मा.श्री.प्रकाश गवळी | जनता सहकारी बँक लि.सातारा |
| मा.श्री.संजय भेंडे | नागपूर नागरिक सहकारी बँक लि.नागपूर |
| मा. सौ. सायली भोईर | दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि., मुंबई |
| मा.श्री.हनुमंत खेडेकर | पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सर्व्हंटस् को-ऑप.अर्बन बँक लि. पुणे |
| मा.श्री.अजय गोळे | -//- |
| मा.श्री.विठ्ठल जगदाळे | -//- |
| मा.श्रीमती तनुजा रावळ | -//- |
| मा.श्री.किरण खोंड | -//- |
| मा.श्री.बाळकृष्ण उंदरे | -//- |
| मा.श्री.पी.डी.कांबळे | -//- |

| | |
|---|---|
| मा.सौ.सुवर्णा रेणूसे | -//- |
| मा.श्री. एस. पोमन | -//- |
| मा.श्री.मोहमद अमीरी | बॉम्बे मर्कंटाईल को-ऑप.बँक लि.मुंबई |
| मा.श्री.एम.एन.मुस्ताली | -//- |
| मा.श्रीमती.ब्रिजदिना कुटिन्हो | बॅसीन कॅथॉलिक को-ऑप.बँक लि.वसई |
| मा.श्रीमती तेरेजा पेरेरा | -//- |
| मा.श्री.रुपेश रॉड्रिग्ज | -//- |
| मा.श्री.रायन फर्नांडिस | -//- |
| मा.श्री.अर्नोल्ड गीगूल | -//- |
| मा.श्री.फ्रान्सिस मस्तान | -//- |
| मा.श्री.अल्बर्ट डाबरे | -//- |
| मा.श्री.विल्सन माचडो | -//- |
| मा.श्री.शंकरराव खराटे | डॉ.जयप्रकाश मुंदडा अर्बन को-ऑप.बँक लि.हिंगोली |
| मा.श्री.फिरोजखान पटाण | मुस्लिम को-ऑप.बँक लि.मुंबई |
| मा.श्री.सुभाष जांभळकर | दि बारामती सहकारी बँक लि.बारामती |
| मा.श्री.विजयराव गालिंदे | -//- |
| मा.श्री.अविनाश लगड | -//- |
| मा.श्री.कपिल बोरवके | -//- |
| मा.श्री.नितीन पिंपरकर | -//- |
| मा.श्री.देवचंद्र आवटी | दि आष्टा पीपल्स को-ऑप.बँक लि.आष्टा |
| मा.श्री.देवराज कांबळे | -//- |
| मा.ॲड.गोरखनाथ झोळ | धर्मवीर संभाजी अर्बन को-ऑप.बँक लि.पुणे |
| मा.श्री.विवेक गोडबोले | -//- |
| मा.श्री.चंद्रकांत मोरे | -//- |
| मा.श्री.सुधीर शिंदे | -//- |
| मा.श्री.सु.ल.रांजणे | दि सातारा सहकारी बँक लि.मुंबई |
| मा.श्री.डी.व्ही.जाधव | -//- |
| मा.श्री.मुकूंद कळमकर | सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑप बँक लि.जिंतुर |
| मा.श्री.शरदराव कोशिरे | श्रीगणेश सहकारी बँक लि.नाशिक |
| मा.श्री.दीपक पिंगळे | -//- |
| मा.श्री.मोरेश्वर सोनार | -//- |
| मा.ॲड.राजेश तांगडे | श्री गजानन नागरी सहकारी बँक लि.बीड |
| मा.डॉ.एम.एस.शेख | -//- |
| मा.श्री.एम.आर.क्षीरसागर | -//- |
| मा.श्री.के.ए.लांडे | -//- |
| मा.श्री.अनिल जाधव | दि सर्वोदय को-ऑप.बँक लि.मुंबई |
| मा.श्री.नितीनदादा कोल्हे | साई संजीवनी को-ऑप.बँक लि.कोपरगांव |

| | |
|---|---|
| मा.श्री.आर.आर.आव्हाड | -//- |
| मा.श्री.रामूशेठ पटेल | -//- |
| मा.श्री.विश्वनाथ जावळे | -//- |
| मा.श्री.बापूराव बारहाते | -//- |
| मा.श्री.पी.एस.सभारंजक | -//- |
| मा.श्री.सचिदानंद जाधव | कृष्णा सहकारी बँक लि.रेठरे बु.मलकापूर |
| मा.श्री.विजय पाटील | दि हस्ती को-ऑप बँक लि.दोंडाईचा |
| मा.श्री.मनोज सोनावणे | -//- |
| मा.श्री.अनिल शिंपी | -//- |
| मा.श्री.सुनिल अग्रवाल | -//- |
| मा.श्री.किशोर चौधरी | -//- |
| मा.श्री.अशोक गुजराथी | -//- |
| मा.श्री.चौदत्त स. पाटील | -//- |
| मा.श्री.अजय काकडे | वर्धा जिल्हा परिषद एम्प्लॉईज (अर्बन) को-ऑप.बँक लि.,वर्धा |
| मा.श्री.राकेश साटोणे | -//- |
| मा.श्री.भास्कर झाडे | -//- |
| मा.श्री.अजय तांबट | दि चिटणविसपूरा सहकारी बँक लि.नागपूर |
| मा.श्री.राम शिवरतन जाजू | वर्धमान अर्बन को-ऑप बँक लि.नागपूर |
| मा.डॉ.रजनी हजारे | सन्मित्र महिला नागरी सहकारी बँक मर्यादीत,चंद्रपूर |
| मा.डॉ.विद्या मसादे | -//- |
| मा.श्रीमती पल्लवी भास्करवार | -//- |
| मा.श्रीमती शिल्पा देसकर | -//- |
| मा.श्रीमती उषा मसादे | -//- |
| मा.श्रीमती माधवी भागवत | -//- |
| मा.श्रीमती वासंती लोहे | -//- |
| मा.श्री.वामनराव लोहे | -//- |
| मा.श्री.नित्यानंद एम.प्रभू | अभ्युदय को-ऑप.बँक लि.मुंबई |
| मा.श्री.मधुकर कुलकर्णी | भाग्यलक्ष्मी महिला सहकारी बँक लि.नांदेड |
| मा.श्री.लक्ष्मण कुलकर्णी | -//- |
| मा.डॉ.श्रीकांत लवेकर | -//- |
| मा.श्री.अशोक गंजेवार | -//- |
| मा.श्रीमती रेखा मोरे | -//- |
| मा.श्रीमती सीमा अतनूरकर | -//- |
| मा.श्री.प्रभाकर महाजन | -//- |
| मा.डॉ.एल.बी.लवेकर | -//- |
| मा.श्री.विजयराव यादव | राजारामबापू को-ऑप बँक लि.पेठ |

| | |
|---|---|
| मा.श्री.विजय पाटील | -//- |
| मा.श्री.शामराव पाटील | -//- |
| मा.श्री.धनाजी पाटील | -//- |
| मा.डॉ.दिपा देशपांडे | -//- |
| मा.श्रीमती अनिता वग्यानी | -//- |
| मा.श्री.अनिल गायकवाड | -//- |
| मा.श्री.शहाजी गायकवाड | -//- |
| मा.श्री.शिवाजी मगर | -//- |
| मा.श्री.आनंदा लकेसर | -//- |
| मा.डॉ.प्रकाश पाटील | -//- |
| मा.श्री.माणिक मदणे | -//- |
| मा.श्री. जगन्नाथ स्वामी | -//- |
| मा.श्री.रविंद्र शिंदे | -//- |
| मा.श्री.संजय पाटील | -//- |
| मा.श्री.नामदेव मोहिते | -//- |
| मा.श्री.संभाजी पाटील | -//- |
| मा.श्री.माधव शेट्ये | दापोली अर्बन को-ऑप बँक लि.दापोली |
| मा.श्रीमती रमा एस.बेळोसे | -//- |
| मा.श्री.दिलीप थेटे | नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी को-ऑप.बँक लि. |
| मा.श्री.अशोक भिकाजी शिंदे | -//- |
| मा.श्री.विजयकुमार हळदे | -//- |
| मा.श्री.सुधीर पगार | -//- |
| मा.श्री.प्रवीण भाबड | -//- |
| मा.श्री.दिपक आहेर | -//- |
| मा.श्री.प्रशांत गोवर्धने | -//- |
| मा.श्री.अजित आव्हाड | -//- |
| मा.श्री.व्ही.एस.बोथरा | अभिनंदन अर्बन को-ऑप.बँक लि.अमरावती |
| मा.श्री.जितेंद्र आंबेरकर | कॉसमॉस को-ऑप.बँक लि.पुणे |
| मा.श्रीमती योगीनी पोकळे | श्रीमंत मालोजी राजे सहकारी बँक लि. |
| मा.श्री.शिरीष देशपांडे | पुणे कमर्शिअल को-ऑप.बँक लि.,पुणे |
| मा.श्री.गोकुलदास राऊत | अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँक लि.,अमरावती |
| मा.श्री.रवींद्र निंघोट | -//- |
| मा.श्री.काशिनाथ मोरे | दि डेक्कन मर्चन्ट को-ऑप बँक लि.मुंबई |
| मा.श्री.दत्ताराम चाळके | अपना सहकारी बँक लि.मुंबई |

| | |
|---|---|
| मा.श्री.सुभाष देवाळकर | श्रीकृष्ण को-ऑपरेटिव्ह बँक लि.उमरेड |
| मा.श्री.प्रशांत ब्रम्हे | -//- |
| मा.श्री.विठ्ठल चिविलकर | कुणबी सहकारी बँक लि.मुंबई |
| मा.श्री.सी.आर.मुल्की | भारत को-ऑप.बँक (मुंबई) लि. |
| मा.श्री.विद्यानंद करकेरा | -//- |
| मा.श्री.दिनेश सॅलियन | -//- |
| मा.श्री.अहमदउल्ला अन्सारी | जनता सहकारी बँक लि.मालेगाव |
| मा.श्री.अब्दुल रशीद अन्सारी | -//- |
| मा.श्री.सुलेमान अन्सारी | -//- |
| मा.श्री.शौकत आसीम | -//- |
| मा.श्रीमती जयश्री काळे | भगिनी निवेदिता सहकारी बँक लि.पुणे |
| मा.श्रीमती शिला काळे | -//- |
| मा.श्रीमती सुरेखा रुईकर | -//- |
| मा.सौ. सुनिता रानडे | -//- |
| मा.सौ.स्मिता देशपांडे | -//- |
| मा.सौ.जयश्री लशकरे | -//- |
| मा.श्री.बाजीराव झावरे | श्रीस्वामी समर्थ सहकारी बँक लि.निघोज |
| मा.श्री.गणेश सुपेकर | -//- |
| मा.श्री.सुभाष मंचरे | -//- |
| मा.श्री.सचिन फापाळे | -//- |
| मा.श्री.प्रसाद झावरे | -//- |
| मा.श्री.बाळासाहेब जगताप | राजर्षि शाहू सहकारी बँक मर्यादित,पुणे |
| मा.श्री.एस.व्ही.धनकवडे | -//- |
| मा.श्री.दिलीपभाई शिंदे | -//- |
| मा.श्री.पद्माकर पवार | -//- |
| मा.श्री.अभय मोहिते | -//- |
| मा.श्री.सचिन पन्हाळे | -//- |
| मा.श्री.स्वप्नील नाईक | -//- |
| मा.श्री.आर.एस.पासलकर | -//- |
| मा.सौ.सुनिता भालेराव | दि चिखली अर्बन को-ऑप.बँक लि.चिखली |
| मा.श्रीमती मृदुला मराठे | -//- |
| मा.श्री. कन्हैयालाल देवी | दि करमाळा अर्बन को-ऑप.बँक लि.करमाळा |
| मा.श्री.रामदास शिंदे | -//- |
| मा.श्री.विनायक चिराटे | -//- |
| मा.श्री.राजेंद्र मिरजे | विश्वेश्वर सहकारी बँक लि.पुणे |

| | |
|---|---|
| मा.श्री.अतूल रुकारी | -//- |
| मा.श्री.श्रीराम आपटे | -//- |
| मा.श्री.बिपीन पटेल | वणा नागरिक सहकारी बँक लि.,हिंगणघाट. जिल्हा-वर्धा |
| मा.श्री.सुरेश सायंकार | -//- |
| मा.श्री.असाद गुलाम मुर्तजा फकीन | नागरिक सहकारी बँक लि.भिवंडी |
| मा.श्री.किरण पटेल | श्री अरिहंत को-ऑप.बँक लि.मुंबई |

फेडरेशनची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा सुरु होण्यापूर्वी फेडरेशनच्या संचालिका मा.श्रीमती शोभाताई सावंत यांनी अहवाल सालात देशाचे रक्षण करताना शहीद झालेले वीर जवान, पंचतत्वात विलीन झालेले थोर नेते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, शिक्षणतज्ञ, बँकिंग व आर्थिक क्षेत्रातील प्रतिभावंत व्यक्ती, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इ.क्षेत्रातील ख्यातीप्राप्त व लोकप्रिय व्यक्ती त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमध्ये निधन पावलेल्या इतर ज्ञात-अज्ञात व्यक्ती यांना श्रध्दांजली अर्पण केली.

तद्नंतर फेडरेशनचे अध्यक्ष मा.श्री विद्याधर अनास्कर यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या सर्व सभासद नागरी सहकारी बँकांचे, जिल्हा-विभागीय असोसिएशन्स्चे मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व पदाधिकारी आणि इतर मान्यवरांचे मन:पूर्वक स्वागत केले.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षीय भाषणात, नुकत्याच झालेल्या पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को-ऑप. बँकेतील घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर फेडरेशनचे अध्यक्ष मा.श्री.विद्याधर अनास्कर उपस्थित सभासद प्रतिनिधींना संबोधित करताना म्हणाले की, सहकारी बँकेच्या संचालक मंडळाचे सदस्यत्व हे केवळ शोभेचे पद नसून ते अत्यंत जबाबदारीचे पद असल्याची जाणीव या क्षेत्राला करुन देण्याची वेळ आली आहे. या बँकेत झालेल्या घोटाळ्यामध्ये जरी सर्वच संचालकांचा सहभाग नसल्याचे मान्य केले तरी निष्काळजीपणा व कर्तव्यपालनात कसूर करणे इ. मुद्यांवर या संचालकांना निश्चितच जबाबदार धरण्यात येईल. त्यामुळे ''संचालक हे 'विश्वस्त' असतात, या घोषवाक्याबरोबरच ते 'जबाबदार विश्वस्त' असतात'' या कायदेशीर घोषवाक्याचीही जाणीव संचालकांना असणे आवश्यक आहे.

वास्तविक बँकिंगसारख्या आर्थिक व्यवसायात संचालक मंडळाने प्रत्येक निर्णय हे व्यावसायिक पध्दतीने व केवळ बँकेचे हित डोळ्यासमोर ठेवून घेणे अपेक्षित असते. परंतु प्रत्यक्षात मात्र तसे होताना दिसत नाही. बँक चालविणारी मोजकी मंडळी जोपर्यंत प्रामाणिक व ज्ञानी आहेत, त्यांच्याकडे नैतिकता आहे व बँकेला पुरेसा वेळ देण्याची मानसिकता आहे, तोपर्यंत त्या बँकेला काही धोका नसतो. परंतु काही व्यक्ती जेव्हा भ्रष्टाचारी व स्वार्थी निघतात, त्यावेळी कालांतराने ती बँक अडचणीत आल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच नागरी सहकारी बँकांच्या संचालकांसाठी 'Fit & Proper' चे निकष निश्चित करण्याची वेळ आली आहे. वास्तविक रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार व आदेशानुसार बँकेचे कामकाज चालणे आवश्यक असते. त्यामुळे बँकेच्या प्रत्येक व्यवहारांबाबत संचालक मंडळात होणारी निर्णय प्रक्रिया ही जशी व्यावसायिक पध्दतीने होणे अपेक्षित आहे, तसेच ती कायद्याच्या चौकटीतच होणे आवश्यक ठरते. अशा वेळी सदर निर्णय प्रक्रियेचे अविभाज्य घटक असणाऱ्या संचालक मंडळातील प्रत्येक सदस्याला त्यासंबंधीची माहिती तसेच रिझर्व्ह बँकेच्या सुपरवायझरी ॲक्शन फ्रेमवर्कमधील नियम, भांडवल पर्याप्तता, थकीत कर्जाच्या वर्गवारीचे नियम, रोख तरलतेचे

व्यवस्थापन, सहकारी संस्थांचा कायदा, नियम, उपविधी यातील तरतूदी इत्यादींची देखील माहिती असणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात मात्र आपल्या नियंत्रकाला अपेक्षित असणारी व्यावसायिकता अथवा नियमांबाबतची चर्चा संचालक मंडळात होताना दिसत नाही. त्यामुळे बऱ्याचवेळा 'सामुहिक जबाबदारी' च्या बडग्यात अनेक सज्जन संचालकही अडकलेले आपण अनुभवले आहेत. त्यामुळे आज ज्ञानी व व्यावसायिकतेचा विचार करणारे संचालक मिळणे या क्षेत्राला अवघड झाले आहे. परिणामी रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार आवश्यक असलेले 'तज्ज्ञ संचालक' मिळेनासे झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर नागरी सहकारी बँकांनी आपल्या उपविधींमध्ये दुरुस्ती करुन संचालकांना रिझर्व्ह बँकेच्या अपेक्षेनुसार 'Fit & Proper' निकष लागू न केल्यास 'बोर्ड ऑफ मॅनेजमेंट' ची संकल्पना रिझर्व्ह बँक पुन्हा एकदा पुढे दामटण्याचा प्रयत्न करेल.

मा.अध्यक्ष पुढे असेही म्हणाले की, रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक गोष्टींसाठी बँकेचे लिखित धोरण असणे आवश्यक आहे व त्या धोरणांनुसारच निर्णय प्रक्रिया होणे आवश्यक आहे. बँकेतील नोकरभरती ही गुणवत्तेवरच झाली पाहिजे. वशिल्याने नोकरीस लागलेला सेवक हा बँकेच्या हितास प्राधान्य देण्यापेक्षा, त्याला ज्या संचालकाने नोकरीस लावले त्याच्या हितास प्राधान्य देतो. त्यामुळे उपकाराखाली दबलेल्या वशिल्याच्या सेवकांपेक्षा गुणवत्तेवर भरती झालेल्या सेवकांमध्ये चुकीच्या कामास 'नाही' म्हणण्याची सक्षम मानसिकता असते.

सध्याच्या युगात 'अष्टावधानी संचालक मंडळ' ही नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राची गरज आहे. बँकेच्या व्यवहारांवर व सेवकांवर नियंत्रण ठेवायचे असेल तर बँकींग व्यवहारांची माहिती प्रत्येक संचालकाला असणे आवश्यक ठरते. संचालक मंडळाच्या सभा, सभेची विषय पत्रिका, प्रत्येक विषयासंबंधीचे सविस्तर टिपण, सभेला येण्यापूर्वी प्रत्येक टिपणीचा सखोल अभ्यास, ती समजून घेण्याची मानसिकता, सभेतील गांभीर्य, निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत जागृकता इ.सर्व गोष्टींमध्ये प्रत्येक संचालकांने व्यावसायिकता ठेवणे गरजेचे झाले आहे. बँकेच्या अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल व त्यामध्ये दर्शविलेल्या त्रुटींचा अभ्यास प्रत्येकाने केला पाहिजे. निदर्शनास आलेल्या प्रत्येक गैरव्यवहाराची चौकशी करण्याचा आग्रह धरला पाहिजे. संचालकांमधील वर्षानुवर्षाच्या वैयक्तिक संबंधाला बाधा येईल, या भीतीपोटी योग्य ठिकाणी आपले विरोधी मत नोंदविण्यास संचालकांनी मागे-पुढे पाहू नये. संचालक मंडळाचा कारभार लोकशाही पध्दतीने चालत असला तरी गटबाजीच्या राजकारणात बँकेला नुकसान होईल असे वर्तन कोणी करु नये. अध्यक्ष पदावर असलेल्या व्यक्तीला श्रेय मिळू नये म्हणून आपल्या ओळखीतील थकीत कर्जदारांना 'पैसे भरु नका', असा सल्ला देणारे संचालकही या सहकार क्षेत्राने पाहिले आहेत. अशा सर्व दुष्ट व सहकार विरोधी वृत्तींना आळा घालण्यासाठी इतर व्यावसायिक धोरणांबरोबरच प्रत्येक नागरी सहकारी बँकेने आपले नैतिक धोरण (Ethical Policy) ठरविणे महत्त्वाचे आहे.

या सर्वांमुळे जनतेचा सहकारी बँकिंग क्षेत्रावरील विश्वास वाढीस लागण्याबरोबरच संचालक मंडळातील प्रत्येक सदस्याचा आत्मविश्वासही वाढीस लागेल व या क्षेत्राची झपाट्याने प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही. यामुळे सध्याच्या युगात अपरिहार्य असणारा 'अष्टावधानीपणा' संचालक मंडळात आल्यास सध्याच्या स्पर्धात्मक युगात आपण खाजगी व राष्ट्रीयीकृत बँकांपुढे एक आव्हान उभे करु शकू ! असा विश्वास मा.अध्यक्षांनी आपल्या भाषणाअंती व्यक्त केला.

वरीलप्रमाणे आपले विचार अध्यक्षीय भाषणात वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नागरी सहकारी बँकांच्या प्रतिनिधींसमोर मांडून मा.अध्यक्ष यांनी विषय पत्रिकेवरील विषयांवर कामकाज सुरु करण्यास फेडरेशनच्या मा. मुख्य कार्यकारी व सचिव यांना सूचना केली असता सभेसमोर विषय पत्रिकेवरील खालील विषयांचे वाचन करण्यात आले.

**विषय क्र.१ : ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन ती क्षमापित करणे.**

फेडरेशनच्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून नागरी सहकारी बँकांचे/जिल्हा-विभागीय असोसिएशन्सचे सुमारे १७२ प्रतिनिधी उपस्थित होते. सदर सभेस गैरहजर असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याची विनंती सभेस केली असता सर्वानुमते खालील ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.१ :** ठराव करण्यात येतो की, फेडरेशनच्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्यात येत आहे.

सुचक : मा.श्री.जगदिश तुळजापूरकर
अनुमोदक : मा.श्री.देवचंद्र आवटी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२ : दिनांक २९ सप्टेंबर,२०१८ रोजी झालेल्या ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

फेडरेशनच्या दिनांक २९ सप्टेंबर,२०१८ रोजी झालेल्या ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त उपस्थित सर्व सभासदांना वाचून दाखविण्यात आले. सभेत संमत झालेल्या ठरावांवर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव यांनी उपस्थित सभासदांना दिली. त्यानंतर खालील ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.२** ठराव करण्यात येतो की, फेडरेशनच्या दिनांक २९ सप्टेंबर,२०१८ रोजी झालेल्या ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येत आहे.

सुचक: मा.श्री.कैलाशचंद्र अग्रवाल
अनुमोदक: मा.श्री.सचिदानंद जाधव
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३ : मा.अध्यक्ष यांनी सादर केलेला सन २०१८-१९ सालचा वार्षिक अहवाल, दि.३१ मार्च, २०१९ अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, तसेच सन २०१८-१९ सालचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवालासहीत स्वीकृत करणे.**

मा.अध्यक्ष यांनी सादर केलेला सन २०१८-१९ सालचा वार्षिक अहवाल, दि.३१ मार्च, २०१९ अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, तसेच सन २०१८-१९ सालचा वैधानिक लेखापरिक्षण

अहवाल, दोष दुरुस्ती अहवालासहीत सभेपुढे सादर केला असता त्यांचे अवलोकन केल्यानंतर खालील ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.३** ठराव करण्यात येतो की, सन २०१८-१९ सालचा वार्षिक अहवाल, दि.३१ मार्च, २०१९ अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, तसेच सन २०१८-१९ सालाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवालासहीत स्वीकारण्यात येत आहे.

सुचक: मा.श्री.अुत्तम जोशी
अनुमोदक: मा.श्री.सुभाष देवाळकर
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४: संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार दिनांक ३१ मार्च,२०१९ अखेरच्या वाढावा विभागणीस मंजुरी देणे.**

दिनांक ३१ मार्च,२०१९ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाअखेर फेडरेशनला प्राप्त झालेल्या उत्पन्नातून खर्च व तरतुदी वजा जाता शिल्लक राहिलेला वाढावा व त्यात गतवर्षीचा उरलेला वाढावा मिळविता एकूण रु.७,३६,४१३.२७ पैसे फक्त वाढाव्याच्या स्वरुपात शिल्लक राहिले आहेत. सदर वाढाव्याची खालीलप्रमाणे विभागणी करण्यात आली असून व त्यास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली असून, अंतिम मंजुरीकरिता वार्षिक सर्वसाधारण सभेस शिफारस केली असता खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.४:** ठराव करण्यात येतो की, दिनांक ३१ मार्च,२०१९ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाअखेर फेडरेशनला प्राप्त झालेल्या उत्पन्नातून खर्च व तरतुदी वजा जाता शिल्लक राहिलेला वाढावा व त्यात गतवर्षीचा उरलेला वाढावा मिळविता रु.७,३६,४१३.२७ पैसे फक्त अशा एकूण वाढाव्याच्या खालील विभागणीस मंजुरी देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| राखीव निधी २५% | ₹ १,८४,११०.०० |
| इमारत आणि विकास फंड | ₹ १,५०,०००.०० |
| अनपेक्षित देणी फंड | ₹ १,५०,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी फंड | ₹ १,००,०००.०० |
| लिव्ह एनकॅशमेंट फंड | ₹ १,५२,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | ₹ ३०३.२७ |
| **एकूण** | **₹ ७,३६,४१३.२७** |

सुचक: मा.श्री.सुनिल देवडा
अनुमोदक: मा.श्री.मुकुंद कळमकर
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.५ सन २०१९-२० सालाकरिता उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.**

फेडरेशनच्या सन २०१९-२० सालाकरिता उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव सभेसमोर सादर केला असता त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.५** ठराव करण्यात येतो की, फेडरेशनच्या सन २०१९-२० सालाकरिता उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येत आहे.

सुचक: मा.श्री.अशोक शेळके
अनुमोदक: मा.श्री.शंकरराव खराटे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.६: संचालक मंडळाने केलेल्या शिफारसीनुसार फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०१९-२० सालाकरिता अंतर्गत लेखापरिक्षक आणि शासनाने मंजूर केलेल्या लेखापरिक्षकांच्या नामतालिकेतील वैधानिक लेखापरिक्षकाच्या नेमणूकीसंदर्भात चर्चा करुन निर्णय घेणे.**

फेडरेशनचे मागील आर्थिक वर्ष (सन २०१८-१९) चे अंतर्गत लेखापरिक्षण करण्याचे काम **मेसर्स प्रितम नेवरेकर ॲण्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** यांच्याकडे सोपविण्यात आले होते.

तसेच फेडरेशनच्या मागील आर्थिक वर्ष (सन २०१८-१९) चे वैधानिक लेखापरिक्षणाचे काम शासनाने मान्यता दिलेल्या पॅनेलवरील **'अ'** गटातील वैधानिक लेखापरिक्षक **मेसर्स एस.डी.साटम ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** यांना देण्यात आले होते.

फेडरेशनचे आगामी **आर्थिक वर्ष २०१९-२०** करिता अंतर्गत लेखापरिक्षण करण्यासाठी **मेसर्स प्रितम नेवरेकर ॲण्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** तसेच वैधानिक लेखापरिक्षणाचे काम शासनाने मान्यता दिलेल्या पॅनेलवरील **'अ'** गटातील वैधानिक लेखापरिक्षक **मेसर्स एस.डी.साटम ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** यांनी त्यांची नेमणूक करणेसंदर्भात अनुक्रमे दि.२०/०६/२०१९ व दि.२७/०६/२०१९ रोजीच्या पत्राद्वारे फेडरेशनला विनंती केली आहे.

त्याचप्रमाणे **मेसर्स प्रितम नेवरेकर ॲण्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** यांनी दि.२०/६/२०१९ रोजीच्या पत्राद्वारे फेडरेशनचे जीएसटी फाइलिंग, सभासद नागरी सहकारी बँकांकडून टॅक्सेशन संदर्भात आलेल्या पत्रांवर कायदेशीर मत देणे, आयकर तथा सेवा कर विभागाद्वारे फेडरेशनला बजावण्यात आलेल्या नोटीशीला अनुसरुन पत्रव्यवहार करणे तसेच फेडरेशनची बाजू संबंधीत अधिकाऱ्यांसमोर मांडणे इ.कामेही त्यांच्याकडे सोपविण्याची विनंती केली आहे.

तरी आगामी आर्थिक वर्ष २०१९-२० करिता फेडरेशनचे अंतर्गत लेखापरिक्षण करण्यासाठी **मेसर्स प्रितम नेवरेकर ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** यांची **'अंतर्गत लेखापरिक्षक'** म्हणून नेमणूक करण्याची व त्याअनुषंगाने त्यांना वार्षिक रु.२०,०००/- प्रोफेशनल फी देण्यास, तसेच वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी शासनाने मान्यता दिलेल्या पॅनेलवरील **'अ'** गटातील वैधानिक लेखापरिक्षक **मेसर्स एस.डी.साटम ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, मुंबई** यांची **'वैधानिक लेखापरिक्षक'** म्हणून नेमणूक करण्याची, व त्याप्रमाणे त्यांना शासनाने दि.२४ ऑक्टोबर,२०१४

रोजी जारी केलेल्या 'लेखापरिक्षण दरपत्रका' नुसार प्रोफेशनल फी अदा करण्यास वार्षिक सर्वसाधारण सभेने मान्यता द्यावी अशी विनंती केल्यानंतर खालील ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.६ :** ठराव करण्यात येतो की, फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०१९-२० करिता अंतर्गत लेखापरिक्षण करुन घेण्यास **मेसर्स प्रितम नेवरेकर ॲण्ड असोसिएटस्,** चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची **'अंतर्गत लेखापरिक्षक'** म्हणून नेमणूक करण्यात येत आहे, व त्याअनुषंगाने त्यांना रु.२०,०००/- फक्त प्रोफेशनल फी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०१९-२० करिता वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी शासनाने मान्यता दिलेल्या पॅनेलवरील 'अ' गटातील वैधानिक लेखापरिक्षक **मेसर्स एस.डी.साटम ॲण्ड कंपनी,** चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची **'वैधानिक लेखापरिक्षक'** म्हणून नेमणूक करण्यात येत आहे, व त्याअनुषंगाने त्यांना शासनाने दि.२४ ऑक्टोबर,२०१४ रोजी जारी केलेल्या लेखापरिक्षण शुल्क दरपत्रकाप्रमाणे प्रोफेशनल फी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक: मा.श्री.जयवंत जालगांवकर
अनुमोदक: मा.श्री.माधव शेट्ये
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.७ :** **महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा,१९६० अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या सहकारी बँकांमध्ये भरती/बढती प्रक्रिया फेडरेशनमार्फत राबविण्यासंदर्भात फेडरेशनच्या उपविधीमधील 'Objects' मध्ये (xxii) चा समावेश करुन तसेच फेडरेशनच्या उत्पन्नामध्ये 'सभासद बँकांना वेळोवेळी पुरविलेल्या विविध सेवेपोटी मिळणारा इतर निधी' चा समावेश उपविधीतील 'Funds' मधील (10) मध्ये करण्यास व त्यानुषंगाने उपविधीत होणाऱ्या दुरुस्तीच्या प्रस्तावास मंजुरी मिळविण्यासाठी आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेस शिफारस करणे.**

महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा,१९६० अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या सहकारी बँकांमध्ये भरती/बढती प्रक्रिया फेडरेशनमार्फत राबविण्यासंदर्भात फेडरेशनच्या उपविधीमधील 'Objects' मध्ये (xxii) चा समावेश करुन तसेच फेडरेशनच्या उत्पन्नामध्ये 'सभासद बँकांना वेळोवेळी पुरविलेल्या विविध सेवेपोटी मिळणारा इतर निधी' चा समावेश उपविधीतील 'Funds' मधील (10) मध्ये करण्यास व त्यानुषंगाने उपविधीत होणाऱ्या दुरुस्तीच्या प्रस्तावामध्ये-

**'Objects' (xxii):-** To conduct recruitment, selection, interview & promotion programmes for Urban Co-operative Banks.

**'Funds' (10):-** Any other sources of funds received from member banks in lieu of services provided.

असा बदल करणेकरिता व त्यास अंतिम मंजुरी मिळणेकरिता आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेस शिफारस करणेबाबतचा ठराव दि.८ ऑगस्ट,२०१९ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत संमत

करण्यात आला आहे. तरी त्यानुषंगाने उपविधीत होणाऱ्या दुरुस्तीस मान्यता मिळावी अशी वार्षिक सर्वसाधारण सभेस विनंती केली असता खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.७:** ठराव करण्यात येतो की, दि.२४/०९/२०१९ रोजी झालेली संस्थेची ४०वी वार्षिक सर्वसाधारण सभा, संचालक मंडळाने आदर्श उपविधीच्या अनुषंगाने संस्थेच्या सद्याच्या उपविधीमध्ये 'Objects' मध्ये (xxii) चा तसेच 'Funds' मध्ये (10) चा समावेश करुन खालील सुधारीत उपविधींना एकमताने मंजुरी देत आहे. तसेच सुधारीत उपविधीस मंजुरी व नोंदणी करिता मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दाखल करणेसाठीच्या प्रस्तावावर सह्या करण्याचे अधिकार संस्थेचे मा.अध्यक्ष, व्य.स.सदस्य व मुख्य कार्यकारी व सचिव यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**'Objects' (xxii):-** To conduct recruitment, selection, interview & promotion programmes for Urban Co-operative Banks.

**'Funds' (10):-** Any other sources of funds received from member banks in lieu of services provided.

सूचक : मा.श्री.संदिप घनदाट
अनुमोदक : मा.श्री.विठ्ठल चिविलकर
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.८:** **मा.वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या फेडरेशनच्या सन २०१८-१९ या वर्षाच्या ताळेबंदातील रु.६००/- पेक्षा कमी व निष्क्रीय अवस्थेत असलेल्या स्थायी मालमत्तेची रक्कम निर्लेखीत करण्यास मान्यता देणे.**

फेडरेशनच्या सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या ताळेबंदात रु.६००/- पेक्षा कमी असलेल्या व निष्क्रीय अवस्थेतील स्थायी मालमत्तेची रक्कम खालीलप्रमाणे उपलब्ध आहे. या स्थायी मालमत्तेच्या घसाऱ्याची रक्कम Reducing Balance पध्दतीनुसार काढण्यात येत असते.

(दि.३१/०३/२०१९ रोजी)

| अ.क्र. | मालमत्तेचा तपशील | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | Telephone Instrument – (5 NOS) | 385.00 | वापरात नाही |
| २ | Bathroom Gizer | 440.00 | -//- |
| ३ | Tea Machine | 311.00 | -//- |
| ४ | Telephone Instrument | 286.00 | -//- |
| ५ | Board of Directors Name Board | 522.00 | -//- |
| ६ | Table (2) | 423.30 | -//- |
| ७ | Storewall | 433.24 | -//- |
| ८ | Ceiling fan 48" Crompton | 222.00 | -//- |
| ९ | Ceiling fan 48" Orient | 251.00 | -//- |
| १० | Wall fan guest room | 207.00 | -//- |

| अ.क्र. | मालमत्तेचा तपशील | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ११ | Water meter 2 sets | 402.00 | -//- |
| १२ | LAN Setting (31.3.2009) | 93.00 | –//- |
| १३ | Installation of Akruti Software- 3 Pcs | 17.00 | –//- |
| १४ | HP Printer-1800 (8.6.2010) | 356.00 | –//- |
| १५ | Mother Board (9.2.2011) | 141.00 | -//- |
| १६ | Wireless Router (30.8.2011) | 98.00 | -//- |
| १७ | CEO's Cabin Lazer Printer | 218.00 | -//- |
| १८ | HP PRINTER 1010 | 281.00 | –//- |
| | **Total** | 5086.54 | –//- |

वैधानिक लेखापरिक्षकांच्या सल्ल्यानुसार वरील संपूर्ण स्थायी मालमत्ता ही निष्क्रीय अवस्थेत असल्यामुळे सदर रक्कम निर्लेखीत करण्यास अनुमती मिळावी अशी विनंती केली असता खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.८ :** ठराव करण्यात येतो की, फेडरेशनच्या सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या ताळेबंदात रु.६००/- पेक्षा कमी असलेली संपूर्ण स्थायी मालमत्ता निष्क्रीय अवस्थेत असल्यामुळे, सदर रक्कम निर्लेखीत करण्यास अनुमती देण्यात येत आहे.

सुचक: मा.श्री.ज्ञानेश्वर वांगडे
अनुमोदक: मा.श्री.मधुकर कुलकर्णी
ठराव सर्वानुमते मंजूर

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेवरील विषयांवरील कामकाज संपल्यानंतर सभासद बँकांच्या प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या अनेक प्रश्नांना फेडरेशनचे अध्यक्ष **मा.श्री.विद्याधर अनास्कर** यांनी समर्पकपणे उत्तरे दिली.

सरतेशेवटी फेडरेशनचे उपाध्यक्ष **मा.श्री.रमाकांत खेतान** यांनी वर्षभरात फेडरेशनच्या दैनंदिन कामकाजात मोलाचे सहाय्य व मार्गदर्शन केलेल्या अनेक मान्यवरांचे/संस्थांचे तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेस आवर्जून उपस्थित असलेल्या सर्व नागरी सहकारी बँकांचे व जिल्हा-विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्च्या प्रतिनिधींचे आभार मानून तद्नंतर विषय पत्रिकेवर अन्य विषय नसल्याने मा.अध्यक्षांच्या परवानगीने वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज दुपारी ठीक ४:०० वाजता संपल्याचे जाहीर केले.

**विद्याधर अनास्कर**
अध्यक्ष

★★★★

# The Maharashtra Urban Co-operative
## Balance Sheet

| LIABILITIES | | | |
|---|---|---|---|
| **31.03.2019** | | **31.03.2020** | |
| | **RESERVE AND OTHER FUNDS** | | |
| 90,66,645.00 | A) RESERVE FUND | 92,51,755.00 | |
| 2,87,09,701.00 | B) BUILDING & DEVELOPMENT FUND | 3,03,59,701.00 | |
| 66,58,890.07 | C) STAFF GRATUITY FUND | 81,63,463.07 | |
| 30,88,314.00 | D) STAFF LEAVE ENCASHMENT FUND | 42,51,541.00 | |
| 13,75,000.00 | E) AMORTISATION FUND FOR LEASE HOLD PREMISES | 14,25,000.00 | |
| 38,50,000.00 | F) UNFORESEEN & CONTINGENT LIABILITY FUND | 55,00,000.00 | |
| 20,44,000.00 | G) STAFF WELFARE FUND | 30,44,000.00 | |
| 0.00 | H) SPECIAL RESERVE FOR INVESTMENT | 16,00,000.00 | |
| **5,47,92,550.07** | | | **6,35,95,460.07** |
| **7,44,750.00** | **PREMIUM RECD. FROM B.M.N. SAH. BKS. ASSO.** | | **7,44,750.00** |
| | **CURRENT LIABILITIES AND PROVISIONS** | | |
| 10,16,422.88 | A) SUNDRY LIABILITIES AND PROVISIONS (SCHEDULE V) | 11,07,491.58 | |
| 59,55,037.00 | B) RESERVE FOR MEMBERSHIP SUBSCRIPTION RECEIVABLE; AS PER CONTRA | 71,16,581.00 | |
| 78,462.00 | C) ADVANCE SUBSCRIPTION ( SCHEDULE VI) | 1,80,576.18 | |
| 64,000.00 | D) PROVISION FOR ANNUAL LEASE RENT | 68,000.00 | |
| **71,13,921.88** | | | **84,72,648.76** |
| | **INCOME AND EXPENDITURE FOR PREVIOUS & CURRENT YEAR** | | |
| 214.70 | PREVIOUS YEAR 2018-19 | 303.27 | |
| 7,36,198.57 | SURPLUS FOR THE CURRENT YEAR | 8,00,002.87 | |
| **7,36,413.27** | | | **8,00,306.14** |
| **6,33,87,635.22** | | | **7,36,13,164.97** |

**Place: Mumbai**
**Date: 19.09.2020**

**VIDYADHAR ANASKAR**
**CHAIRMAN**

**RAMAKANT KHETAN**
**VICE CHAIRMAN**

# Banks' Federation Ltd.
## as on 31.03.2020

| ASSETS | | | |
|---|---|---|---|
| **31.03.2019** | | | **31.03.2020** |
| | **CASH AND BANK BALANCES** | | |
| 4,585.00 | A) CASH IN HAND | 1,03,881.00 | |
| | B) BANK BALANCE | | |
| 11,12,659.05 | I) APNA SAH. BANK | 76,22,309.34 | |
| 42,980.70 | II) M.S.C. BANK | 88,316.70 | |
| 60,154.00 | III) UCO BANK | 62,283.00 | |
| **12,20,378.75** | | | **78,76,790.04** |
| | **INVESTMENT & DEPOSIT** | | |
| 4,97,24,000.00 | A) FIXED DEPOSIT WITH BANKS | 5,22,71,584.00 | |
| 11,500.00 | B) TELEPHONE DEPOSIT | 11,500.00 | |
| 41,603.00 | C) B.E.S.T. DEPOSIT | 41,603.00 | |
| 5,625.00 | D) MAHANAGARPALIKA WATER METER SECURITY DEPOSIT | 5,625.00 | |
| 10,07,077.00 | E) RECEIVABLE INT. ON FIXED DEPOSIT RECEIPT | 5,55,175.00 | |
| **5,07,89,805.00** | | | **5,28,85,487.00** |
| **18,52,237.47** | **FIXED ASSETS-LESS DEPRECIATION (SCHEDULE I)** | | **16,62,632.93** |
| **30,00,000.00** | **PREMIUM ON LEASED PREMISES** | | **30,00,000.00** |
| | **SUNDRY DEBTORS & OTHER ASSETS** | | |
| 59,55,037.00 | A) MEMBERSHIP SUBSCRIPTION RECEIVABLE; AS PER CONTRA (SCHEDULE II) | 71,16,581.00 | |
| 41,609.00 | B) ADVANCES - FESTIVAL | 14,400.00 | |
| 29,835.00 | C) PREPAID INSURANCE & AMC | 41,867.00 | |
| 1,777.00 | D) WATER CHARGES & ANNUAL LEASE RENT -FROM B.M. ASSOCIATION RECEIVABLE | 8,446.00 | |
| 1,78,128.00 | E) TDS RECEIVABLE ( SCHEDULE III) | 2,46,412.00 | |
| 1,40,824.00 | F) SERVICE TAX RECOVERABLE | 1,40,824.00 | |
| 1,27,801.00 | G) INCOME TAX DEMAND | 4,28,035.00 | |
| 48,600.00 | H) RENTING CONFERENCE HALL RECEIVABLE | 1,67,400.00 | |
| 1,603.00 | I) GST ON MEMBERS' SUBSCRIPTION RECEIVABLE (SCHEDULE IV) | 24,290.00 | |
| **65,25,214.00** | | | **81,88,255.00** |
| **6,33,87,635.22** | | | **7,36,13,164.97** |

**SAYALI BHOIR**
**CHIEF EXECUTIVE-SECRETARY**

**PRITAM NEVREKAR**
**CHARTERED ACCOUNTANTS**

**S. D. SATAM & Co.**
**CHARTERED ACCOUNTANTS**

# The Maharashtra Urban Co-operative

## Income & Expenditure Account for

| 31.03.2019 | EXPENDITURE | 31.03.2020 | |
|---|---|---|---|
| | **EMPLOYEE COST** | | |
| 51,54,752.00 | SALARIES AND ALLOWANCES | 48,50,730.00 | |
| 1,03,485.00 | TRAVELLING EXPENSES - STAFF | 48,187.00 | |
| 24,012.00 | P.F. ADMINISTRATIVE CHARGES | 21,472.00 | |
| **52,82,249.00** | | | **49,20,389.00** |
| | **BOARD OF DIRECTORS EXPENSES** | | |
| 573,240.00 | TRAVELLING EXPENSES - DIRECTORS | 4,33,328.00 | |
| 24,838.00 | MEETING EXPENSES | 33,740.00 | |
| **5,98,078.00** | | | **4,67,068.00** |
| | **OFFICE EXPENSES** | | |
| 4,74,149.40 | PRINTING AND STATIONERY | 4,97,140.00 | |
| 1,14,636.00 | POSTAGE, TELEPHONE & TELEGRAM | 98,561.00 | |
| 1,06,795.90 | OFFICE EQUIPMENT - MAINTENANCE & SERVICE CHARGES | 1,83,882.00 | |
| 2,35,683.00 | ANNUAL GENERAL MEETING EXPENSES | 1,64,855.00 | |
| **9,31,264.30** | | | **9,44,438.00** |
| | **FEES, COMMISSION ETC.** | | |
| 750.00 | PROFESSIONAL TAX | 750.00 | |
| 27,968.00 | AUDIT FEES | 29,826.00 | |
| 2,673.63 | BANK COMMISSION | 2,918.59 | |
| 60,500.00 | PROFESSIONAL FEES | 95,304.00 | |
| 99,050.00 | MEMBERSHIP SUBSCRIPTION | 1,12,450.00 | |
| **1,90,941.63** | | | **2,41,248.59** |
| | **PROPERTY EXP. (RENT, TAXES, INSU., ELE., DEP., REPAIRS ETC.)** | | |
| 1,71,388.00 | ELECTRICITY EXPENSES | 1,58,552.00 | |
| 50,000.00 | AMORTISATION OF LEASE PREMIUM | 50,000.00 | |
| 1,45,571.00 | ANNUAL LEASE RENT EXPENSES | 77,571.00 | |
| 2,42,341.00 | MUNICIPAL TAX | 2,42,341.00 | |
| 2,41,562.00 | DEPRECIATION | 2,34,620.00 | |
| 6,680.00 | REPAIRING EXPENSES | 19,260.00 | |
| 32,707.00 | WATER CHARGES | 17,555.00 | |
| 10,244.00 | INSURANCE PREMIUM | 8,278.00 | |
| **9,00,493.00** | | | **8,08,177.00** |
| | Balance Carried Forward | | |

| | | |
|---|---|---|
| **Place: Mumbai** | **VIDYADHAR ANASKAR** | **RAMAKANT KHETAN** |
| **Date: 19.09.2020** | **CHAIRMAN** | **VICE CHAIRMAN** |

# Banks' Federation Ltd.

## the period 01.04.2019 to 31.03.2020

| 31.03.2019 | INCOME | 31.03.2020 | |
|---|---|---|---|
| | **1) MEMBERSHIP SUBSCRIPTION** | | |
| 5,96,279.00 | A) ARREARS FOR PREVIOUS YEARS (SCHEDULE VII ) | 12,99,656.00 | |
| 89,83,535.00 | B) CURRENT YEAR 2019-2020 | 90,56,000.00 | |
| **95,79,814.00** | | | **1,03,55,656.00** |
| | **2) INTEREST RECEIVED** | | |
| 40,16,166.50 | A) INTEREST RECEIVED ON INVESTMENT | 44,69,473.00 | |
| 32,602.00 | B) BANK INTEREST RECEIVED | 40,138.00 | |
| 0.00 | C) INTEREST RECEIVED ON IT REFUND | 2,166.00 | |
| **40,48,768.50** | | | **45,11,777.00** |
| | **3) OTHER INCOME** | | |
| 8,000.00 | A) MISCELLANEOUS INCOME | 2,000.00 | |
| 17,095.00 | B) SALE OF BOOKS ( SCHEDULE VIII) | 27,310.00 | |
| 2,10,000.00 | C) INCOME FROM SPONSORSHIP | 14,68,004.00 | |
| 4,000.00 | D) INCOME FROM RENTING ROOM & PROJECTOR | 11,000.00 | |
| 6,71,000.00 | E) RENTING CONFERENCE HALL | 7,33,000.00 | |
| 6,30,000.00 | F) INCOME FROM TRAINING | 5,05,000.00 | |
| 0.00 | F) INCOME FROM CONFERENCE | 12,65,000.00 | |
| 3,17,062.00 | G) NAGARI BANK VARTAPATRA ADVERTISEMENT CHARGES | 4,52,762.00 | |
| 30,544.00 | H) FINANCIAL ASSISTANCE FROM NCUI FOR BOOK PURCHASED | 0.00 | |
| 20,000.00 | I) INCOME FROM DONATION | 20,000.00 | |
| **19,07,701.00** | | | **44,84,076.00** |
| | Balance Carried Forward | | |

| SAYALI BHOIR | PRITAM NEVREKAR | S. D. SATAM & Co. |
|---|---|---|
| CHIEF EXECUTIVE-SECRETARY | CHARTERED ACCOUNTANTS | CHARTERED ACCOUNTANTS |

# The Maharashtra Urban Co-operative

## Income & Expenditure Account for

| 31.03.2019 | EXPENDITURE | 31.03.2020 | |
|---|---|---|---|
| | **OTHERS** | | |
| 41,879.00 | MISCELLANEOUS EXPENSES | 41,254.00 | |
| 15,880.00 | NEWSPAPER & MAGAZINE EXPENSES | 18,620.00 | |
| 1,38,459.00 | OFFICE REFRESHMENT EXPENSES | 1,14,128.00 | |
| 56,493.00 | STAFF WELFARE EXPENSES | 18,078.00 | |
| 1,43,479.00 | GIFT & ARTICLE EXEPENSE | 1,41,520.00 | |
| 1,72,324.00 | VEHICLE - FUEL, REPAIRING AND MAINTENANCE | 1,93,301.00 | |
| 2,77,522.00 | TRAINING / SEMINAR EXPENSES | 12,99,344.00 | |
| 0.00 | ADVERTISEMENT EXPENSES | 24,320.00 | |
| 16,324.00 | BOOKS PURCHASE EXPENSES | 33,796.00 | |
| 1,87,500.00 | PERFORMANCE AWARD SCHEME EXPENDITURE | 92,750.00 | |
| 24,499.00 | RENT- GUEST HOUSE | 250.00 | |
| 3,19,900.00 | LABOUR CONTRACT | 5,88,600.00 | |
| 0.00 | LOSS ASSETS WRITTEN OFF | 4,224.54 | |
| 300.00 | LATE FEES | 0.00 | |
| 2,500.00 | DIGITAL SIGNATURE | 0.00 | |
| **13,97,059.00** | | | **25,70,185.54** |
| **55,00,000.00** | TRANSFERRED TO VARIOUS FUNDS ( SCHEDULE IX) | | **86,00,000.00** |
| **7,36,198.57** | **EXCESS OF RECEIPT OVER EXPENDITURE** | | **8,00,002.87** |
| **1,55,36,283.50** | | | **1,93,51,509.00** |

**Place: Mumbai** **VIDYADHAR ANASKAR** **RAMAKANT KHETAN**

**Date: 19.09.2020** **CHAIRMAN** **VICE CHAIRMAN**

# Banks' Federation Ltd.

## the period 01.04.2019 to 31.03.2020

| 31.03.2019 | INCOME | 31.03.2020 | |
|---|---|---|---|
| | | | |
| 1,55,36,283.50 | | | 1,93,51,509.00 |

| SAYALI BHOIR | PRITAM NEVREKAR | S. D. SATAM & Co. |
|---|---|---|
| CHIEF EXECUTIVE-SECRETARY | CHARTERED ACCOUNTANTS | CHARTERED ACCOUNTANTS |

## SCHEDULE I – FIXED ASSETS AS ON 31.03.2020

| PARTICULARS | RATE | W.D.V. ON 01.04.2019 | ADDITION | | TOTAL | DEPRECIATION DURING YEAR | NET BALANCE AS ON 31/03/2020 | SALE/WRITTEN OFF LOSS ASSETS | W.D.V. ON 31.03.2020 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | UPTO SEP'2019 | AFTER SEP'2019 | | | | | |
| FUNITURE & FIXTURE | **10%** | 1268198.67 | - | - | 1268198.67 | 126818.00 | 1141380.67 | 2215.54 | **1139165.13** |
| **TOTAL OF BLOCK OF FUNITURE & FIXTURE** | | **1268198.67** | **0.00** | **0.00** | **1268198.67** | **126818.00** | 1141380.67 | **2215.54** | **1139165.13** |
| **PLANT & MACHINERY** | | | | | | | | | |
| COMPUTER | **33%** | 32753.00 | 27500.00 | 14407.00 | 74660.00 | 22486.00 | 52174.00 | 801.00 | **51373.00** |
| MOTOR VEHICLE | **15%** | 274248.00 | - | - | 274248.00 | 41137.00 | 233111.00 | 0.00 | **233111.00** |
| ELECTRIC INSTALLATION & OFFICE EQUIPMENTS | **15%** | 246463.00 | 7203.00 | - | 253666.00 | 38052.00 | 215614.00 | 1208.00 | **214406.00** |
| **TOTAL OF BLOCK OF PLANT & MACHINERY** | | **553464.00** | **34703.00** | **14407.00** | **602574.00** | **101675.00** | 500899.00 | **2009.00** | **498890.00** |
| **LIBRARY ACCOUNT** | **20%** | 30574.80 | - | 130.00 | 30704.80 | 6127.00 | 24577.80 | 0.00 | **24577.80** |
| **TOTAL** | | **1852237.47** | **34703.00** | **14537.00** | **1901477.47** | **234620.00** | 1666857.47 | **4224.54** | **1662632.93** |

## SCHEDULE II - SUMMARY OF MEMBER SUBSCRIPTION RECEIVABLE AS ON 31/03/2020

| YEAR | MEMBER BANK | MEMBER ASSOCIATION | GROSS Amount |
|---|---|---|---|
| 2006-07 | 54,000.00 | - | 54,000.00 |
| 2007-08 | 66,000.00 | - | 66,000.00 |
| 2008-09 | 67,500.00 | - | 67,500.00 |
| 2009-10 | 97,000.00 | - | 97,000.00 |
| 2010-11 | 1,18,500.00 | - | 1,18,500.00 |
| 2011-12 | 1,30,500.00 | - | 1,30,500.00 |
| 2012-13 | 1,67,257.00 | - | 1,67,257.00 |
| 2013-14 | 2,75,000.00 | - | 2,75,000.00 |
| 2014-15 | 3,11,000.00 | - | 3,11,000.00 |
| 2015-16 | 3,75,255.00 | 4,500.00 | 3,79,755.00 |
| 2016-17 | 5,75,907.00 | 4,500.00 | 5,80,407.00 |
| 2017-18 | 9,76,914.00 | 6,000.00 | 9,82,914.00 |
| 2018-19 | 13,85,548.00 | 9,000.00 | 13,94,548.00 |
| 2019-20 | 24,81,200.00 | 11,000.00 | 24,92,200.00 |
| **TOTAL** | **70,81,581.00** | **35,000.00** | **71,16,581.00** |

## SCHEDULE III - T.D.S. RECEIVABLE AS ON 31.03.2020

| Years | Amount |
|---|---|
| 2014-15 | 21250.00 |
| 2015-16 | 1403.00 |
| 2016-17 | 26779.00 |
| 2017-18 | 18606.00 |
| 2019-20 | 66666.00 |
| 2020-21 | 111708.00 |
| **TOTAL** | **246412.00** |

## SCHEDULE IV - GST ON MEMBERS' SUBSCRIPTION RECEIVABLE AS ON 31.03.2020

| Particulars | Amount |
|---|---|
| AURANGABAD DIST. IND.URBAN CO-OP BANK LTD | 90.00 |
| THE MAHARASHTRA STATE CO-OP BANK LTD | 23,000.00 |
| USMANABAD JANATA SAHAKARI BANK LTD | 1,200.00 |
| **TOTAL** | **24,290.00** |

## SCHEDULE V - SUNDRY LIABILITIES AS ON 31/03/2020

| PARTICULARS | AMOUNT |
|---|---|
| PROVISION FOR EX-GRATIA | 6,30,806.00 |
| INTERNAL AUDIT FEES PAYABLE | 20,000.00 |
| STATUTORY AUDIT FEES PAYABLE | 9,826.00 |
| TELEPHONE CHARGES PAYABLE | 3,586.00 |
| WATER CHARGES PAYABLE | 4,000.00 |
| ELECTRICITY CHARGES PAYABLE | 14,000.00 |
| SWAYAM ENTERPRISES | 2,158.00 |
| CLASSIC COOL SERVICE | 9,409.00 |
| LABOUR CONTRACT PAYABLE | 65,354.00 |
| MEETING EXPENSES PAYABLE | 12,180.00 |
| INDIAN BANKS ASSOCIATION SUBSCRIPTON PAYABLE | 53,100.00 |
| MISCELLANEOUS EXPENSES PAYABLE | 800.00 |
| NEWS PAPER EXPENSES PAYABLE | 1,210.00 |
| MAHALAXMI ENTERPRISES DTDC COURIER | 101.00 |
| GST PAYABLE | 80,148.58 |
| INCOME TAX PAYABLE | 64,609.00 |
| TDS PAYABLE | 2,229.00 |
| PROFESSIONAL TAX PAYABLE | 1,200.00 |
| PROVIDENT FUND PAYABLE | 62,522.00 |
| PROVIDENT FUND ADMINISTRATION CHARGES PAYABLE | 1,753.00 |
| HONORARIUM FEES PAYABLE | 2,500.00 |
| STAFF SECURITY DEPOSIT | 66,000.00 |
| **TOTAL** | **11,07,491.58** |

## SCHEDULE VI - ADVANCE SUBSCRIPTION
## AS ON 31.03.2020

| | |
|---|---|
| ADVANCE SUBSCRIPTION | 1,80,576.18 |

## SCHEDULE VII - ARREARS SUBSCRIPTION RECEIVED
## FOR YEAR ENDED 31.03.2020

| YEAR | AMOUNT |
|---|---|
| 2010-2011 | 20,000.00 |
| 2011-2012 | 2,000.00 |
| 2012-2013 | 5,000.00 |
| 2013-2014 | 5,000.00 |
| 2014-2015 | 38,000.00 |
| 2015-2016 | 37,356.00 |
| 2016-2017 | 34,000.00 |
| 2017-2018 | 1,17,344.00 |
| 2018-2019 | 10,40,956.00 |
| **TOTAL** | **12,99,656.00** |

## SCHEDULE VIII - SALE OF BOOKS
## AS ON 31.03.2020

| PARTICULARS | AMOUNT |
|---|---|
| 97TH CONSTITUTIONAL AMENDMENT | 2,200.00 |
| BANKANVISHAI SARVAKAHI | 7,175.00 |
| MAITRI BANKINGSHI | 7,000.00 |
| NAGARI BANK VARTAPATRA | 1,540.00 |
| NAGARI SAHAKARI BANKANCHE SANCHALAK V SEVAKANSATHI | 3,375.00 |
| OTHER BOOKS | 4,500.00 |
| HOW TO FACE SAF ? | 1,520.00 |
| **TOTAL** | **27,310.00** |

## SCHEDULE IX - TRANSFERRED TO VARIOUS FUNDS
## AS ON 31.03.2020

| PARTICULARS | AMOUNT |
|---|---|
| BUILDING & DEVELOPMENT FUND | 15,00,000.00 |
| STAFF GRATUITY FUND | 15,00,000.00 |
| STAFF LEAVE ENCASHMENT FUND | 15,00,000.00 |
| STAFF WELFARE FUND | 10,00,000.00 |
| UNFORSEEN & CONTINGENT LIABILITY FUND | 15,00,000.00 |
| SPECIAL RESERVE FOR INVESTMENT | 16,00,000.00 |
| **TOTAL** | **86,00,000.00** |

## PREPAID INSURANCE & AMC
## AS ON 31.03.2020

| PARTICULARS | AMOUNT |
|---|---|
| CAR INSURANCE POLICY | 1,010.00 |
| FAXONICS TECHNOLOGY PVT. LTD. (FAX) | 317.00 |
| LAKSHYA CONSULTANCY PVT. LTD. (EMAIL, WEBSITE) | 14,405.00 |
| SAGAR INFOCOM (COMPUTER) | 11,000.00 |
| SHANTANU INFOCOMM (EPABX) | 2,938.00 |
| CLASSIC COOL SERVICES (AC) | 9,540.00 |
| EUREKA FORBES (AQUAGARD) | 2,657.00 |
| **TOTAL** | **41,867.00** |

## INCOME TAX DEMAND
## AS ON 31.03.2020

| PARTICULARS | AMOUNT | AMOUNT |
|---|---|---|
| TAX DEMAND NOTICE 2016-17 (15%) | 6,39,010.00 | 95,851.00 |
| TAX DEMAND NOTICE 2017-18 (5%) | | 31,950.00 |
| TAX DEMAND NOTICE 2019-20 (20%) | 15,01,168.00 | 3,00,234.00 |
| **TOTAL** | **21,40,178.00** | **4,28,035.00** |

## RENTING CONFERENCE HALL RECEIVABLE
## FROM WELLNESS AS ON 31.03.2020

| PARTICULARS | AMOUNT |
|---|---|
| FEB-20 | 1,02,600.00 |
| MAR-20 | 64,800.00 |
| **TOTAL** | **1,67,400.00** |

## SUMMARY OF SERVICE TAX RECOVERABLE
## AS ON 31.03.2020

| PARTICULARS | AMOUNT |
|---|---|
| SERVICE TAX RECOVERABLE DURING THE YEAR 2012-13 | 75,332.00 |
| SERVICE TAX RECOVERABLE DURING THE YEAR 2013-14 | 65,492.00 |
| **TOTAL** | **1,40,824.00** |

S.D.SATAM & CO.
*CHARTERED ACCOUNTANTS*
C-2003, STATION PLAZA, STATION ROAD, BHANDUP WEST, MUMBAI: - 400078.M - 9820496081 / 9820641936

## STATUTORY AUDITOR'S REPORT

We have audited the attached Balance Sheet of THE MAHARASHTRA URBAN CO-OPERATIVE BANKS' FEDERATION LTD., MUMBAI as at 31st March, 2020 and also the foregoing Income & Expenditure Account for the year ended up to that date.

These financial statements are the responsibility of the Federation's Management. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We haveconducted our audit in accordance with generally accepted auditing standards subject to the scope of audit as laid down by the Board of Directors. An audit includes examining, on a test check basis, evidence supporting the amounts and disclosures in the financial statements. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion.

On the basis of the information and explanation given to us, we are of the opinion that:-

1. We have obtained all the information and explanation which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit.
2. Proper books of account as required by the Act, Rules and Bye-laws of the federation have been kept by the federation so far as appears from our examination of the books.
3. The transactions of the federation which have come to our notice have been within the powers of the federation.
4. During F.Y. 2019-2020 we are giving Audit "A" Classification to the federation.
5. The accounts give the information required by the Act in the manner so required and give a true and fair view :-
   a) In the case of Balance Sheet, of the state of affairs of the federation as at 31st March 2020.
   b) In the case of the Income & Expenditure Statement, of the Surplus for the year ended on the date.
6. All the above certification is subject to remarks stated in part A, B & C of the Statutory Audit report.

Date: 19 / 09 / 2020.

Place: Mumbai

UDIN: 20104904AAAAOA7643

For S.D.Satam & Co.

S. D. SATAM & CO. BHANDUP MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

Chartered Accountants
(Santosh Satam)

# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि.

## खर्चाचे अंदाजपत्रक

| खर्च | सन २०१९-२० चा खर्चाचा अंदाज रु. पैसे | सन २०१९-२० चा प्रत्यक्ष खर्च रु. पैसे | अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जास्त/कमी झालेला खर्च रु. पैसे | सन २०२०-२१ चा खर्चाचा अंदाज रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| पगार व भत्ते | ७०,००,०००.०० | ४८,५०,७३०.०० | (२१,४९,२७०.००) | ५५,००,०००.०० |
| कर्मचारी प्रवास खर्च | १,००,०००.०० | ४८,१८७.०० | (५१,८१३.००) | २०,०००.०० |
| प्रा. फंड प्रशासकीय खर्च | ३०,०००.०० | २१,४७२.०० | (८,५२८.००) | ३०,०००.०० |
| संचालक प्रवास खर्च | ६,००,०००.०० | ४,३३,३२८.०० | (१,६६,६७२.००) | २,००,०००.०० |
| बैठक खर्च | ३०,०००.०० | ३३,७४०.०० | ३,७४०.०० | २५,०००.०० |
| छपाई व स्टेशनरी | ५,००,०००.०० | ४,९७,१४०.०० | (२,८६०.००) | २,००,०००.०० |
| टपाल, तार व टेलिफोन | १,२५,०००.०० | ९८,५६१.०० | (२६,४३९.००) | ५०,०००.०० |
| ऑफिस इक्वीपमेंट-मेंटेनन्स, सर्व्हिस चार्जेस | १,२५,०००.०० | १,८३,८८२.०० | ५८,८८२.०० | २,००,०००.०० |
| वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | २,५०,०००.०० | १,६४,८५५.०० | (८५,१४५.००) | १,५०,०००.०० |
| प्रोफेशनल टॅक्स | १,०००.०० | ७५०.०० | (२५०.००) | ७५०.०० |
| ऑडीट फी | ३०,०००.०० | २९,८२६.०० | (१७४.००) | ३०,०००.०० |
| बँक कमिशन | ३,०००.०० | २,९१८.५९ | (८१.४१) | ५,०००.०० |
| प्रोफेशनल फी | १,००,०००.०० | ९५,३०४.०० | (४,६९६.००) | १,२५,०००.०० |
| सभासद वर्गणी | १,००,०००.०० | १,१२,४५०.०० | १२,४५०.०० | १,२५,०००.०० |
| इलेक्ट्रीसीटी चार्जेस | २,००,०००.०० | १,५८,५५२.०० | (४१,४४८.००) | १,००,०००.०० |
| अमोरटायझेशन ऑफ लीज प्रिमिअम | ५०,०००.०० | ५०,०००.०० | - | ५०,०००.०० |
| वार्षिक लीज भाडे व मेंटेनन्स चार्जेस | १,५०,०००.०० | ७७,५७१.०० | (७२,४२९.००) | १,००,०००.०० |
| म्युनिसिपल टॅक्स | २,५०,०००.०० | २,४२,३४१.०० | (७,६५९.००) | २,५०,०००.०० |
| घसारा | ३,००,०००.०० | २,३४,६२०.०० | (६५,३८०.००) | २,५०,०००.०० |
| दुरुस्ती खर्च | १०,०००.०० | १९,२६०.०० | ९,२६०.०० | २५,०००.०० |
| पाणीपट्टी | ३५,०००.०० | १७,५५५.०० | (१७,४४५.००) | २०,०००.०० |
| विमा हप्ता | १२,०००.०० | ८,२७८.०० | (३,७२२.००) | १२,०००.०० |
| किरकोळ खर्च | ५०,०००.०० | ४१,२५४.०० | (८,७४६.००) | २०,०००.०० |
| न्युजपेपर व मॅगझीन खर्च | १६,०००.०० | १८,६२०.०० | २,६२०.०० | २०,०००.०० |
| ऑफिस रिफ्रेशमेंट खर्च | १,५०,०००.०० | १,१४,१२८.०० | (३५,८७२.००) | ५०,०००.०० |
| स्टाफ वेलफेअर खर्च | ७०,०००.०० | १८,०७८.०० | (५१,९२२.००) | २०,०००.०० |
| भेटवस्तू खर्च | १,५०,०००.०० | १,४१,५२०.०० | (८,४८०.००) | १,५०,०००.०० |
| वाहन-इंधन, दुरुस्ती व जपणूक | २,००,०००.०० | १,९३,३०१.०० | (६,६९९.००) | १,२५,०००.०० |
| प्रशिक्षण/सेमिनार खर्च | ५,००,०००.०० | १२,९९,३४४.०० | ७,९९,३४४.०० | १,००,०००.०० |
| जाहिरात खर्च | ३०,०००.०० | २४,३२०.०० | (५,६८०.००) | ५०,०००.०० |
| पुस्तक खरेदी | - | ३३,७९६.०० | ३३,७९६.०० | - |
| पुरस्कार योजना खर्च | २,००,०००.०० | ९२,७५०.०० | (१,०७,२५०.००) | १,००,०००.०० |
| गेस्ट हाऊस भाडे | ३०,०००.०० | २५०.०० | (२९,७५०.००) | १०,०००.०० |
| लेबर चार्जेस | ३,५०,०००.०० | ५,८८,६००.०० | २,३८,६००.०० | ५,१०,०००.०० |
| बुडित कर्जे निर्लेखीत | - | ४,२२४.५४ | ४,२२४.५४ | - |
| स्थावर मालमत्ता खरेदी | - | - | - | १,५०,०००.०० |
| विविध निधीमध्ये वर्ग | - | ८६,००,०००.०० | | १६,००,०००.०० |
| खर्च वजा जाता वाढावा | १२,५३,०००.०० | ८,००,००२.८७ | } ८१,४७,००२.८७ | ११,४७,२५०.०० |
| **एकूण** | १,३०,००,०००.०० | १,९३,५१,५०९.०० | ६३,५१,५०९.०० | १,१५,२०,०००.०० |

# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि.

## उत्पन्नाचे अंदाजपत्रक

| उत्पन्न | सन २०१९-२० चा उत्पन्नाचा अंदाज<br>रु. पैसे | सन २०१९-२० चा प्रत्यक्ष उत्पन्न<br>रु. पैसे | अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जास्त/कमी झालेले उत्पन्न<br>रु. पैसे | सन२०२०-२१ चा उत्पन्नाचा अंदाज<br>रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| सभासद वर्गणी | ८०,००,०००.०० | १,०३,५५,६५६.०० | २३,५५,६५६.०० | ७५,००,०००.०० |
| गुंतवणूकीवरील मिळालेले व्याज | ४०,००,०००.०० | ४५,११,७७७.०० | ५,११,७७७.०० | ४०,००,०००.०० |
| इतर उत्पन्न | १०,००,०००.०० | ४४,८४,०७६.०० | ३४,८४,०७६.०० | २०,०००.०० |
| एकूण | १,३०,००,०००.०० | १,९३,५१,५०९.०० | ६३,५१,५०९.०० | १,१५,२०,०००.०० |

सभासद नागरी सहकारी बँकांना विनंती करण्यात येते की, फेडरेशनच्या वार्षिक वर्गणीचे दर दि.३१ मार्च,२०२० च्या ठेवींवर आधारित असून खालील दरपत्रकाप्रमाणे आपली वर्गणी पाठवून सहकार्य करावे.

### सन २०१९-२० चे वार्षिक वर्गणी दरपत्रक

| तपशील | वर्गणी | जीएसटी १८% | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| रु.५ कोटी पर्यंत ठेवी असलेल्या बँका | रु. ७,०००/- | रु. १,२६०/- | रु. ८,२६०/- |
| रु.५ कोटी ते १५ कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँका | रु. ९,०००/- | रु. १,६२०/- | रु. १०,६२०/- |
| रु.१५ कोटी ते २५ कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँका | रु. १२,०००/- | रु. २,१६०/- | रु. १४,१६०/- |
| रु.२५ कोटी ते ५० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँका | रु. १४,०००/- | रु. २,५२०/- | रु. १६,५२०/- |
| रु.५० कोटी ते १०० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँका | रु. २०,०००/- | रु. ३,६००/- | रु. २३,६००/- |
| रु.१०० कोटी ते २०० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँका | रु. २७,०००/- | रु. ४,८६०/- | रु. ३१,८६०/- |
| रु.२०० कोटी ते ५०० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँका | रु. ३०,०००/- | रु. ५,४००/- | रु. ३५,४००/- |
| रु.५०० कोटी ते १००० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँका | रु. ३५,०००/- | रु. ६,३००/- | रु. ४१,३००/- |
| रु.१००० कोटी ते ३००० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँका | रु. ४०,०००/- | रु. ७,२००/- | रु. ४७,२००/- |
| रु.३००० कोटीच्या वर ठेवी असलेल्या बँका | रु. ५०,०००/- | रु. ९,०००/- | रु. ५९,०००/- |
| जिल्हा/विभागीय बँक्स् असोसिएशन्स् | — | — | — |
| २५ पेक्षा कमी सभासद असलेल्या बँका | रु २,०००/- | रु.३६०/- | रु.२,३६०/- |
| २५ ते ५० सभासद असलेल्या बँका | रु.३,०००/- | रु.५४०/- | रु.३,५४०/- |
| ५० पेक्षा जास्त सभासद असलेल्या बँका | रु.४,०००/- | रु.७२०/- | रु.४,७२०/- |
| ‘सहयोगी’ अथवा ‘नाममात्र’ सभासद | रु.८,०००/- | रु.१,४४०/- | रु.९,४४०/- |

# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि. मुंबई

## संचालक मंडळ

### (सन २०१४-१५ ते २०१९-२०२०)

| | |
|---|---|
| मा.श्री.विद्याधर वामनराव अनास्कर (अध्यक्ष) | विद्या सहकारी बँक लि., पुणे |
| मा.श्री.रमाकांत उमाशंकर खेतान (उपाध्यक्ष) | दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑप. बँक लि., अकोला |
| मा.श्री.आनंदराव विठोबा अडसूळ (संचालक) | सिटी को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा.श्री.संदिप सिताराम घनदाट (संचालक) | अभ्युदय को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा.श्री.ज्ञानेश्वर बापूसाहेब वांगडे (संचालक) | दि सातारा सहकारी बँक लि., मुंबई |
| मा.श्री.भास्करराव कृष्णा कोठावदे (संचालक) | दि ओझर मर्चन्टस् को-ऑप.बँक लि., ओझर |
| मा.श्री.अजय जव्हेरीलाल ब्रम्हेचा (संचालक) | दि लासलगांव मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., लासलगांव |
| मा.श्री.अुत्तम भास्कर जोशी (संचालक) | ठाणे भारत सहकारी बँक लि., ठाणे |
| मा.श्री.विजय प्रकाश ढेरे (संचालक) | पुणे मर्चन्टस् को–ऑप. बँक लि., पुणे |
| कै.दामोदर कृष्णाजी माजगांवकर (संचालक)<br>(मृत्यू : दि.४ सप्टेंबर, २०२०) | ओमदत्त चैतन्य सहकारी बँक लि.,वाई |
| मा.श्री.सुनिल ओमप्रकाश देवडा (संचालक) | ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप. बँक लि., हिंगोली |
| मा.श्री.सतिश भगवानदास गुप्ता (संचालक) | दि चिखली अर्बन को-ऑप.बँक लि., चिखली |
| मा.श्री. जगदिश प्रल्हाद तुळजापूरकर (संचालक) | सोलापूर जिल्हा नागरी सह. बँक्स् को-ऑप.असोसिएशन लि., सोलापूर |
| मा.श्री.दुर्गादास दत्तात्रय नेवे (संचालक) | जळगांव जिल्हा अर्बन को-ऑप.बँक्स् असोसिएशन लि., जळगांव |
| मा.श्री.कैलाशचंद्र जुगलकिशोर अग्रवाल (संचालक) | विदर्भ अर्बन बँक्स् को-ऑपरेटिव्ह असोसिएशन लि., नागपूर |
| मा.श्रीमती शोभाताई सुधाकर सावंत (संचालिका) | दि अण्णासाहेब सावंत अर्बन को-ऑप.बँक महाड लि., महाड |
| मा.डॉ.शशीताई भगवानराव अहिरे (संचालिका) | दि नाशिक जिल्हा महिला सहकारी बँक लि., नाशिक |
| मा.श्री.जयवंत शंकर जालगांवकर (संचालक) | दापोली अर्बन को-ऑप.बँक लि., दापोली |
| मा.श्री.अशोक भिकाजी शेळके (संचालक) | श्री स्वामी समर्थ सहकारी बँक लि., निघोज |
| मा.श्री.प्रकाश कोंडीराम गवळी (संचालक) | जनता सहकारी बँक लि., सातारा |
| मा.श्री.सिताराम बाबूराव आडसूळ (स्वीकृत संचालक) | दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असो.लि., मुंबई |
| मा.श्री.संजय नाथुजी भेंडे (स्वीकृत संचालक) | नागपूर नागरिक सहकारी बँक लि., नागपूर |
| मा.सौ.सायली संजय भोईर (मुख्य कार्यकारी व सचिव) | दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स् फेडरेशन लि., मुंबई |

✿✿✿✿

# संचालक मंडळ



मा.श्री.विद्याधर अनास्कर
अध्यक्ष



मा.श्री.रमाकांत खेतान
उपाध्यक्ष



मा.श्री.आनंदराव अडसूळ
संचालक



मा.श्री.संदिप घनदाट
संचालक



मा.श्री.ज्ञानेश्वर वांगडे
संचालक



मा.श्री.भास्करराव कोठावदे
संचालक



मा.श्री.अजय ब्रम्हेचा
संचालक



मा.श्री.अुत्तम जोशी
संचालक



मा.श्री.विजय ढेरे
संचालक



कै.दा.कृ.माजगांवकर
संचालक
(मृत्यू : दि.४ सप्टेंबर,२०२०)



मा.श्री.सुनिल देवडा
संचालक



मा.श्री. सतीश गुप्ता
संचालक



मा.श्री.जगदिश तुळजापूरकर
संचालक



मा.श्री.दुर्गादास नेवे
संचालक



मा.श्री.कैलाशचंद्र अग्रवाल
संचालक



मा.श्रीमती शोभाताई सावंत
संचालिका



मा.डॉ. शशीताई अहिरे
संचालिका



मा.श्री.जयवंत जालगांवकर
संचालक



मा.श्री.अशोक शेळके
संचालक



मा.श्री.प्रकाश गवळी
संचालक



मा.श्री.सिताराम आडसूळ
स्वीकृत संचालक



मा.श्री.संजय भेंडे
स्वीकृत संचालक



मा.सौ.सायली भोईर
मुख्य कार्यकारी व सचिव